## वरळी हिट अँड रनप्रकरणी मुख्य आरोपी मिहीर शाहाला अटक

**मुंबई :** मुंबईतल्या वरळी भागात भरधाव वेगात बीएमडब्ल्यू कार चालवून महिलेला चिरडल्याची घटना दोन दिवसांपूर्वी घडली होती. या घटनेत महिलेचा मृत्यू झाला होता. या प्रकरणातील मुख्य आरोपी मिहीर शाह याला मंगळवारी (दि. ९) अटक करण्यात आली आहे. मुंबई पोलिसांनी मिहीला शहापूरमधून अटक केली आहे. याशिवाय त्याची आई आणि बहिणीलासुद्धा ताब्यात घेण्यात आल्याची माहिती आहे. मिहीर शाह हा शिवसेना शिंदे गटाचे उपनेते राजेश शाह यांचा मुलगा असल्याचं सांगितले जात आहे.


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. १० जुलै २०२४

किंमत ४ ₹







# मच्छिमार संकटात

## थकीत परतावा तातडीने द्या, आ. जयंत पाटील यांची मागणी




> शासनाकडून एप्रिल ते मे २०२४ पर्यंतचा सुमारे साडेसहा कोटी रुपयांचा डिझेल परतावा थकीत आहे. जूनपासून तीन महिने मासेमारीला बंदी असल्याने मच्छिमार आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे शासनाने तातडीने थकीत परतावा द्यावा.
>
> – विजय गिदी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ, मुंबई

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शासनाकडून डिझेल परतावा वेळेवर मिळत नसल्याने जिल्ह्यातील मच्छिमार आर्थिक संकटात सापडले आहेत. कोकण किनाऱ्यावर येणारी चक्रीवादळे, रासायनिक कंपन्यांमुळे होणारे प्रदूषण, घटणारे मत्स्योत्पादन यामुळे मच्छिमार संकटात सापडला आहे. अशातच आता डिझेल परताव्याची रक्कम थकल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. ही बाब आ. जयंत पाटील यांच्या लक्षात येताच त्यांनी आक्रमक पवित्रा घेत चालू वर्षाचा डिझेल परतावा तातडीने देण्याची मागणी अधिवेशनात मंगळवारी (दि.९) केली आहे. त्यामुळे मच्छिमार बांधवांची डिझेल परतावा मिळण्याची आशा पल्लवित झाली आहे.

येणारा खर्च आणि मिळणारे उत्पन्न याची सांगड घालताना मच्छिमार बांधवांना मोठी कसरत करावी लागत आहे. गतवर्षीदेखील शेकापचे आ. जयंत पाटील यांनी याबाबत आवाज उठविला होता. त्यानंतर २०२३- २०२४ या आर्थिक वर्षात ६०.८ कोटी रुपयांचा निधी वितरीत केल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात मच्छिमार आहेत. जिल्ह्यात सुमारे पाच हजारांहून अधिक बोटी असून, त्यात यांत्रिकी व विनायांत्रिकी बोटींचा समावेश आहे. मासेमारीतून विक्रेत्यांसह वाहतूक करणारे, कामगार अशा हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून आहे. यामुळे अनेकांना रोजगाराचे साधन मिळत आहे. जिल्ह्यातील किनारपट्टी भागातील ११२ गावांमध्ये मासेमारीचा व्यवसाय केला जातो. ४९ हजारांहून अधिक लोकांच्या माध्यमातून ३० हजार कुटुंबे या •› पान २ वर

# पावसाचं धुमशान, रायगडकरांचं नुकसान



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जिल्हाभरात रविवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे सखल भागातील अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. याशिवाय गाय, शेळ्यामेंढ्यासह बकऱ्या या पशुधनाची मोठी हानी झाली असून, २५हून अधिक घरांसह दहा गोठ्यांची पडझड होऊन नुकसान झाले. रस्ते खचले, शेतांमध्ये पाणी साचल्याने भातांच्या रोपांसह बांधबंदिस्तीदेखील नुकसान झाले आहे. पुलांना भगदाड पडल्याने अनेक गावांचा, वाड्यांचा संपर्क तुटला. त्यामुळे रविवारचा पाऊस लाखोंची हानी करणारा ठरला. मागील चोवीस •› पान २ वर

### सोशल मीडियाचा आधार

**अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांसह नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले. या नुकसानीची माहिती तातडीने मिळविण्यासाठी प्रशासनाने सोशल मीडियाचा आधार घेतला आहे. कोतवाल, तलाठ्यांमार्फत सोशल मीडियावर मेसेज करून नुकसान झालेल्या व्यक्तींची नावे नावे पाठविण्याचे काम सुरु केले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्तांची माहिती तात्काळ मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.**

### शेतकऱ्यांनी अशी काळजी घ्यावी

- शेतातून अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.
- अतिपावसात रोपांची लागवड टाळावी.
- शेतालगतचे नाले मोकळे करून पाणी जाण्याचा मार्ग करावा.
- भातरोपे दोन दिवसांपर्यंत पाण्यात सापडल्यास पाण्याचा ओघ कमी झाल्यानंतर दाणेदार युरियाचा हलकासा हप्ता द्यावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## पीएनजी, सीएनजीच्या दरात वाढ

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

महानगर गॅस लिमिटेडने नवे दर लागू केले असून, ९ जुलैपासून सर्वत्र लागू झाले आहेत. त्यानुसार गॅसच्या किमतीतील वाढ अंशतः पूर्ण करण्यासाठी एमजीएलने सीएनजीच्या किमतीत १.५० रुपये प्रतिकिलो आणि घरगुती पीएनजीच्या किमतीत १ रुपये प्रति स्टँडर्ड क्यूबिक मीटर मुंबई आणि आसपास वाढ केली आहे. या वाढीनंतर सीएनजीची सुधारित किंमत सर्व करांसह ७५ रुपये प्रतिकिलो होईल. तर, मुंबई आणि आसपासच्या देशांतर्गत पीएनजीची किंमत ४८ रुपये प्रतिकिलो किंमत मोजावी लागणार आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसणार आहे.

# अखेर ‘उमटे’चे भगदाड बुजवले

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

साठ हजारांहून अधिक नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या उमटे धरणाला भगदाड पडले होते. यामुळे ऐन पावसाळ्यात आजूबाजूच्या गावांना धोका निर्माण होण्याची शक्यता होती. परंतु, याविरोधात शेकापसह संघर्ष समितीने आवाज उठवताच प्रशासनास जाग आली. अखेर या धरणाची डागडुजी करण्यास जिल्हा परिषद प्रशासनाला यश आले आहे. जिल्हा परिषद सेस फंडातून त्याची दुरुस्ती करण्यात आली आहे. दरम्यान, या धरणाच्या गाळाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, सीएफटीआयच्या संचालिका चित्रलेखा पाटील यांनी पुढाकार घेतला असून, मोठ्या प्रमाणात धरणातून गाळ काढण्यात आला आहे.


■ जि.प. सेस फंडातून दुरुस्तीचे काम

### काळजी मिटली


**उमटे धरणाच्या भिंतीला पडलेल्या भगदाडामुळे परिसरातील नागरिक भीतीच्या छायेखाली होते. परंतु, जि.प. प्रशासनाकडून भिंतीची डागडुजी करण्यात आल्याने परिसरातील गावांना दिलासा मिळणार असून, नागरिकांची काळजी मिटली आहे. दरम्यान, धरणावर अवलंबून असणाऱ्या गावांना सुलभरित्या पाणीपुरवठा सुरू राहण्यास मदत होणार आहे.**

उमटे धरणाची निर्मिती १९७८ साली करण्यात आली. त्यानंतर १९९५ साली हे धरण जीवन प्राधिकरणाकडून रायगड जिल्हा परिषदेला हस्तांतरीत झाले. धरणाची साठवण क्षमता ८७ दशलक्ष घनफूट आहे. पाण्याची शेवटची •› पान २ वर

# म्हसळ्यात पावसाचा कहर

**। आंबेत । वार्ताहर ।**

कोकण विभागामध्ये रत्नागिरी सिंधुदुर्ग रायगड या तीन जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस कोसळला. रायगड जिल्ह्यामध्ये सर्वाधिक पाऊस हा म्हसळा तालुक्यात झाला असून, २०४ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली. त्यामुळे म्हसळा शहरासह तालुक्यातील इतर गावांनादेखील या पावसाचा फटका बसला. तालुक्यातील बाजूलाच असणाऱ्या ढोरजे गावाकडे जाणारा पूलदेखील पावसाच्या पाण्याखाली गेल्यामुळे अनेक गावांचा संपर्क



तुटला होता. घोणसे माणगाव राष्ट्रीय महामार्गावरील घाटामध्ये देखील मोठ्या प्रमाणात दरड •› पान २ वर

# ॲम्ब्युलन्स खरेदीत महाघोटाळा

## विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार कडाडले

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात ॲम्ब्युलन्स घोटाळा झाला आहे. या खरेदीत टेंडर फुगवले गेले असून, तीन हजार कोटींचे काम दहा हजार कोटींवर नेले आहे. ३० टक्क्यांच्यावर कमिशन या घोटाळ्यात घेतले गेले आहे. हा ॲम्ब्युलन्स घोटाळा कोणाच्या पुत्रासाठी केला जातोय, या घोटाळ्यात किती नेत्यांचे खिसे गरम झालेत, असे सवाल करत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी या संपूर्ण प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी मंगळवारी विधानसभेत केली आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र लुटा आणि गुजरातला वाटा, अशा शब्दात त्यांनी सरकारचे वाभाडे काढले.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, ॲम्ब्युलन्स घोटाळा हा राज्यातील सर्वात मोठा घोटाळा आहे. हे सरकार रुग्णांच्या टाळूवरचे लोणी खात आहे. सनदी अधिकाऱ्यांनी या घोटाळ्याला विरोध केला म्हणून त्यांची बदलीदेखील झाली. निवडणूक फंडासाठी हा उद्योग सुरू आहे. आरोग्य यंत्रणेचे धिंडवडे निघत असताना हा घोटाळा केला जात आहे. महाराष्ट्र लुटून साफ करण्याचा उद्योग सुरू आहे. त्यामुळे या घोटाळ्याची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी विजय •› पान २ वर



## वसंत मोरेंच्या हाती मशाल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

माजी नगरसेवक वसंत मोरे यांनी मंगळवारी (दि. ९) मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश करीत हाती मशाल घेतली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी पूर्वीपेक्षा अनेक पटीने पुण्यात शिवसेना वाढवा, असे आवाहन शिवसेनेत प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना केले. वसंत मोरे पुणे महापालिकेत तीनवेळा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी मनसेचा राजीनामा दिला होता. त्यांना वंचित बहुजन आघाडीने पुण्यातून लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरविले होते.









## अतिवृष्टीमुळे नागरिकांसह शेतकऱ्यांचे नुकसान

# सरसकट पंचनामे करा

### चित्रलेखा पाटील यांची मागणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीने नागरिकांसह शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, पंचनामे करताना नुकसानीचे सरसकट करण्यात यावे, अशी मागणी शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांनी केली आहे.

रविवारी रात्रीपासून पावसाचा जोर सुरु राहिल्याने अनेक घरांमध्ये पाणी शिरले.पावसामुळे पनवेल तालुक्यातील तोंडरे येथील काही घरांमध्ये पाणी शिरून नुकसान झाले. अलिबाग तालुक्यातील नागाव, बुरूमखाण, चौल, नेहुली, मुळे, बामणोली, राजमळा, महाजने, रामराज, भिलजी बोरघर, पेझारी या गावांमधील काही घरांमध्ये पाणी शिरले. घरातील अनेक वस्तूंचे प्रचंड नुकसान झाले. पशुधनाचीदेखील मोठी हानी झाली आहे. भातांची रोपेदेखील पाण्याखाली आल्याने नुकसान झाले आहे.त्यामुळे शेतकऱ्यांसह जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संकटात सापडले आहेत.



याबाबत चित्रलेखा पाटील यांनी नुकसानग्रस्त गावांना भेटी दिल्या. तेथील ग्रामस्थ, शेतकरी व महिलांची समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्नदेखील केला. तसेच त्यांनी गरजूंना आर्थिक मदतीचा हात दिला. दरम्यान, प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे. परंतु, नुकसान झालेल्या मोजक्याच वस्तूंचे पंचनामे न करता सरसकट पंचनामे करण्यात यावेत, अशी मागणी शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.




# अतिवृष्टीमुळे बळीराजाच्या स्वप्नांवर पाणी



- शेतीमध्ये पाणी साचल्याने पिके कुजण्याची भीती
- शेतकऱ्यांना दुबार पेरणीचे संकट
- शासनातर्फे तात्काळ नुकसानभरपाई देण्याची मागणी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

गेल्या तीन ते चार दिवसांत झालेल्या अतिवृष्टीमुळे उरण तालुक्यातील भातशेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. पावसामुळे शेतात पाणीच पाणी झाले असून, लावलेल्या भाताची रोपेही वाहून गेली असल्याने दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर येऊन ठेपले आहे. त्यामुळे नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे.

जून महिन्याचा शेवटचा आठवडा व जुलै महिना उजाडल्यापासून सलग पाऊस पडत असल्याने उरण तालुक्यात भातशेतीची पेरणी आटोपली होती. रोपांची वाढदेखील बऱ्यापैकी झाली होती, त्यामुळे चांगले उत्पादन होईल अशी आशा होती, मात्र जुलै महिन्यात होत असलेल्या अतिवृष्टीमुळे भातशेतीचे नुकसान झाले. पुरामुळे भाताच्या खाचरांमध्ये चिखल गोळा झाला आहे. पाण्याच्या प्रवाहामुळे शेतांचे बांधदेखील फुटले आहेत.

शेतातील सुपिक मातीदेखील खरडून गेली आहे. शेतात दगडगोटे वाहून आले आहेत. शेतीच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी उरणमधील स्थानिक शेतकरी करत आहेत. उरण तालुक्यातील पूर्व विभागातील, खोपटे, कोप्रोली, पाणदिवे, आवरे, गोवठणे, पाले, पिरकोन, सारडे, वशेणी, पुनाडे, मोठी जुई, कळंबुसरे, चिरनेर, भोम, टाकीगाव, विंधणे, वेश्वी, दिघोडे व कंठवली या गावांमध्ये अजूनही शेती लावली जाते. मात्र, सलग तीन ते चार दिवस पडणाऱ्या पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झालेले पाहायला मिळत आहे.

याशिवाय बी-बियाणे, खत, मजुरांची मजुरी या खर्चाचा बोजा शेतकऱ्यांवर पडणार आहे. व्यवस्थित पाऊस झाल्यामुळे लावणीला या भागात सुरुवात झाली होत काही लोकांच्या लावण्याही पूर्ण झाल्या होत्या. भरघोस पीक येईल अशी आशा परिसरातील शेतकऱ्यांना होती. मात्र, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या स्वप्नांवर पाणी फिरले असून, दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर येऊन ठेपले आहे. तर काही शेतकऱ्यांनी भाताचे रो घरी करून ठेवण्याचीदेखील तयारी केली आहे.

> आमच्या शेतांच्या पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. बी-बियाणे, खते यालादेखील बराच खर्च झाला आहे. त्यात वाढत्या महागाईमुळे बियाणे, खते यांचे भावही वाढले आहेत. शेतात अतिवृष्टीमुळे पाणी झाल्याने आमचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे, त्यामुळे आमच्या शेतांचे पंचनामे करून आम्हाला नुकसानभरपाई मिळावी.
>
> – बळीराम भोईर, शेतकरी, सारडे–उरण

> पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा येथील शेतकऱ्यांचे नुकसान झाले तर त्यांना नुकसानभरपाई मिळते. मात्र, आमचे नुकसान झाले तरी आम्हाला शासनाच्या वतीने कोणतीही भरपाई मिळत नाही. नेहमी आमच्या विभागाला दुर्लक्षित केले जाते.
>
> – हरिश्चंद्र खारकर, शेतकरी, पाणदिवे–उरण

# विरोधकांकडून सरकारचा धिक्कार

## विधिमंडळाच्या पायऱ्यांवर जोरदार घोषणाबाजी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात वाढलेल्या भ्रष्टाचाराच्या विरोधात पावसाळी अधिवेशनाच्या दहाव्या दिवशी विधिमंडळ परिसरात महाविकास आघाडी आक्रमक झाली. विरोधी पक्षाच्या आमदारांनी 'भ्रष्टाचारी झाले चौकीदार, असा महायुतीचा कारभार, भ्रष्टाचाऱ्यांना क्लीन चीट देणाऱ्या सरकारचा धिक्कार असो' अशा गगनभेदी घोषणा देत सरकारच्या विरोधात जोरदार निदर्शने केली.

मुंबई येथे महाविकास आघाडीच्या आमदारांनी भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून विधान भवनाच्या पायऱ्यांवर जोरदार निदर्शने केले. 'भाजपा हटवा, भ्रष्टाचार मिटवा, महायुती सरकारची ऑफर पक्षप्रवेश करा, क्लीन चिट मिळवा, शूर आम्ही मिंधे, दादा आणि भाजपचे सरदार चिरडून गरिबांना होऊ पसार, मदतीला आमच्या मिध्यांचे सरकार', सर्वसामान्यांच्या जीवाला नाही मोल, श्रीमंतांचा पैशांच्या जीवावर सुरू खेळ, भाजपाची वॉशिंग मशीन, आधी आरोप मग क्लीन चीट, भ्रष्टाचारी झाले चौकीदार, असा महायुतीचा कारभार, हिट अँड रनच्या आरोपींना मदत करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो' अशा विविध घोषणा लिहिलेले फलक हाती घेत राज्यातील भ्रष्टाचाराविरोधात महाविकास आघाडी आक्रमक होत गगनभेदी घोषणा देत विधानभवन परिसर दणाणून सोडला.



# रंगांतून साधणार स्वच्छतेबाबत संवाद

- ४ हजार ४५ संवादक कुटुंबांना देणार गृहभेटी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात स्वच्छतेचे दोन रंग, हिरवा ओला व निळा सुका अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे. हे अभियान ७ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. या अभियानात प्रत्येक ग्रामपंचायत हद्दीत ५ असे ४ हजार ४५ संवादक कुटुंबांना गृहभेटी घेऊन संवाद साधणार आहेत. त्यानुसार कचरा वर्गीकरण व व्यवस्थापनमध्ये ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग द्यावा, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी केले आहे.

शाश्वत स्वच्छतेसाठी विविध विषयांच्या अनुषंगाने गृहभेटीच्या माध्यमातून जनजागृती साठी हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. अभियानात प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये पाच संवादक घरांना भेटी देऊन ओला, सुका कचरा व्यवस्थापन, प्लास्टिक व्यवस्थापन, मैला गाळ व्यवस्थापनाबाबत माहिती देतील. यासाठी जिल्ह्यातील ८०९ ग्रामपंचायतींमध्ये ४ हजार ४५ संवादक कार्यरत राहतील.

संवादक म्हणून सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्राम पाणीपुरवठा स्वच्छता समिती, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, गट समन्वयक, जल सुरक्षक यांचा समावेश करण्यात आला आहे.

# बोर्ले गावात साकारणार क्रीडांगण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळजवळील जिते ग्रामपंचायतीमधील बोर्ले गावात दोन एकर जागेमध्ये क्रीडांगण विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या पुढाकाराने हे क्रीडांगण विकसित होत असून, या क्रीडांगणाच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या सरपंच रेणुका मिरकुटे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण विकसित कार्याचा शुभारंभ करण्यात आला.



पूर्वीच्या कोल्हारे आणि आताच्या जिते ग्रामपंचायतीमधील बोर्ले गावात मोठ्या प्रमाणात गुरचरण जमीन आहे. या जमिनीतील दोन एकर भूखंडावर क्रीडा केंद्र विकसित व्हावे, असे स्वप्न गावातील ज्येष्ठ ग्रामस्थ शशिकांत मोहिते यांनी पाहिले होते. सध्या बोर्ले परिसरात नवीन लोकवस्ती वाढत आहे. वयोवृद्धांना सकाळी चालण्यास मोकळे मैदान मिळेल, संपूर्ण जिते ग्रामपंचायतीमधील तरुणांना मैदानी खेळ खेळण्यास वाव मिळेल. यासाठी येथील दोन एकर जमिनीवर क्रीडांगण विकसित केले जात आहे. या क्रीडांगणाला छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण असे नाव देण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला होता. हे मैदान विकसित होण्यासाठी ग्रामस्थांची ग्रामपंचायतीकडे मागणी सुरू आहे. मात्र, या कामाचा शुभारंभ आणि नामफलक अनावरण करण्याचा कार्यक्रम ग्रामस्थांच्या उपस्थितीत झाला.

यावेळी मौजे बोर्ले येथे स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण या कमानीचे लोकार्पण जिते सरपंच रेणुका मिरकुटे यांच्या हस्ते फीत कापून झाले. यावेळी माजी उपसरपंच तुकाराम भोईर, माजी उपसरपंच प्रसाद टोंडलेकर तसेच ग्रामविकास अधिकारी पांडुरंग म्हसे, ग्रामपंचायत सदस्य वंदना भोईर, वंदना हजारे आणि ग्रामस्थ शशिकांत मोहिते आदी उपस्थित होते.

# 'लाडकी बहीण'साठी अर्ज भरण्याचे शिबीर

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

शासनाने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा महिलांना लाभ मिळावा, यासाठी चिरनेर गावात चिरनेर ग्रामपंचायतीच्या वतीने व उरण तहसील कार्यालयाच्या सहकार्याने दि. ११ व १२ जुलै रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ या कालावधीत या योजनेचे अर्ज भरण्याच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी चिरनेर गावात चिरनेर ग्रामपंचायतीच्या वतीने व उरण तहसील कार्यालयाच्या सहकार्याने अर्ज भरण्याच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सरपंच भास्कर मोकल व उपसरपंच सचिन घबाडी यांनी दिली.

# पिल्लई कॉलेजविरोधात प्रकल्पग्रस्तांचे ठिय्या आंदोलन

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनीतील पिल्लई कॅम्पसचे बांधकाम होत असताना आंबिवली तर्फे तुंगारतन गावकऱ्यांना गावातील सर्व मुलांना तसेच परिसरातील प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना मोफत शिक्षण देऊ असे शाळा प्रशासनाने सांगितले होते. परंतु, कित्येक वर्षे होऊनही कोणत्याही प्रकल्पग्रस्त मुलांना शिक्षणात मोफत सामावून न घेतल्याने स्थानिकांत संतापाचे वातावरण होते. ही मागणी पूर्ण करण्याकरिता महाराष्ट्र नवनिर्माण सेना वासांबे विभाग अध्यक्ष विनोद शिंदे यांच्यामार्फत मागील महिन्याभरापासून पाठपुरावा सुरु होता. कोणताही सकारात्मक तोडगा न निघाल्याने पिल्लई शाळा व्यवस्थापन विरोधात शाळेच्या काही अंतरावर सोमवार, दि. ८ जुलैपासून ठिय्या आंदोलन सुरु करण्यात आले. या आंदोलनाला सर्वपक्षीयांचा पाठिंबा मिळत आहे.



# दिघोडे गावाला रुग्णवाहिका भेट

- महेंद्र घरत यांची सामाजिक बांधिलकी

**। उरण । वार्ताहर ।**

यमुना सामजिक संस्थेचे अध्यक्ष तथा इंदिरा काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या माध्यमातून दिघोडे गावासाठी रुग्णवाहिका भेट देऊन सामाजिक बांधिलकी जपली आहे. रुग्णावाहिका लोकापर्ण सोहळ्याचे दिघोडे ग्रामपंचायत तसेच ग्रामस्थ मंडळ यांच्यावतीने रविवारी आयोजन करण्यात आले होते. महेंद्र घरत यांनी ही दिलेली रुग्णवाहिका ही १३ वी भेट दिली असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.



या रुगणवाहिकेचे लोकार्पण महेंद्र घरत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मिलिंद पाडगावकर, अखलाख शिलोत्री, डॉ. मनीष पाटील, महेंद्र ठाकूर, विनोद म्हात्रे, १८ गाव कृती समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, न्यू मेरिटाईम जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष वैभव पाटील, सचिन घरत, माजी सरपंच अविनाश पाटील, विद्यमान सरपंच किर्तिनिधी ठाकूर, उपसरपंच अभिजित पाटील, कृष्णा पारिंगे, रेखा घरत आदी प्रामुख्याने उपस्थित होते.



# शिबिरात ५३५ महिलांचे अर्ज दाखल

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड जंजिरा नगरपरिषद हद्दीतील लाडकी बहीण योजनेसाठी पात्र असलेल्या लाभार्थ्यांना अर्ज करणे सुलभ व्हावे या उद्देशाने मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात तीन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

महिलांना त्रास होऊ नये याकरिता नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार यांनी वॉर्ड क्रमांकनिहाय १० टेबल लावण्यात आले होते. त्यानुसार अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. शहरातील महिलांनी याला चांगला प्रतिसाद दिला. या तीन दिवसीय शिबिरात ५३५ महिलांनी सहभाग नोंदवून ऑफलाईन अर्ज भरले.

या मोहिमेकरिता नंदकुमार आंबेतकर, नरेंद्र नांदगांवकर, संजय वेटकोळी, सचिन कोकरे, सुदेश माळी, श्वेता विरकुड, मयुर चौलकर, पल्लवी डोंगरीकर, प्रणाली शिंदे, प्रेरणा चौलकर, सतेज निमकर, मीनाक्षी गुंजाळ, जयेश चोडणेकर, आरती शेडगे, नम्रता करडे, प्रीती सैंदाणे, मनोज पुलेकर, अविनाश अवघडे, राकेश राखडे, अविनाश ठाकूर, सचिन कोरके, भरत शिंदे, संजय वेटकोळी आदींसह कर्मचाऱ्यांनी ऑफलाईन व ऑनलाईन अर्ज भरण्याचे काम पाहिले.

# झाड कोसळून एक जखमी

**। रसायनी । वार्ताहर ।**

मुसळधार पावसामुळे दांड-रसायनी रस्त्यालगत असणारा दांडजवळचा जुनाट महाकाय वृक्ष उन्मळून एका पिकअप रिक्षावर पडल्याने रिक्षातील एकजण जखमी झाल्याची घटना घडली.

दांडफाटा जवळ रस्त्यालगतचा वृक्ष उन्मळून पडल्याने याचवेळी आलेली पिकअप रिक्षा झाडाच्या फांद्यांच्या संपर्कात आली. दैव बलवत्तर म्हणून रिक्षातील एकजण किरकोळ जखमी झाला. ही घटना रसायनी पोलीस ठाण्याचे पीआय संजय बांगर यांना समजताच त्यांनी तात्काळ फायर ब्रिगेडचे अधिकारी मोरे यांना फोन करुन संपर्क साधला आणि घटनास्थळी दाखल झाले. यावेळी पीएसआय धोंडे, गोपनीय अंमलदार राहुल भडाळे, पोलीस वळवी, पोलीस बाई धुळधर, पोलीस डफळ यांच्यासह अपघातग्रस्त टीम रसायनी, आयआरबी टीम सदस्यांनी उपस्थित राहून रस्त्यावर कोसळलेल्या वृक्षाच्या फांद्या काढून जेसीबीच्या सहाय्याने बाजूला केल्या. यावेळी काहीवेळ वाहतूक ठप्प होती. परंतु, रसायनी पोलिसांच्या सतर्कतेमुळे रस्त्यावर उन्मळून पडलेला महाकाय वृक्ष बाजूला करुन वाहतूक सुरळीत केल्याने प्रवाशांनी कौतुक केले.



पान १ वरून

## पावसाचं धुमशान, रायगडकरांचं नुकसान

तासामध्ये जिल्ह्यातील म्हसळ्यामध्ये २२७ मि.मी., मुरूडमध्ये २१५ मि.मी., अलिबागमध्ये १८० मि.मी., तळामध्ये १६७ मि.मी., उरणमध्ये १५० मि.मी., रोहामध्ये ११५ मि.मी., खालापूरमध्ये ९१ मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली आहे. रविवारपासून सुरु असलेल्या पावसामुळे नद्यादेखील पाण्याने भरल्या आहेत. मात्र, अंबा नदीसह काही प्रमुख नद्यांची पातळी इशारा पातळीपेक्षा कमी आहे. या अतिवृष्टीमुळे घरांचे नुकसान झाले आहे. त्यात १३ कच्ची, तर ११ पक्क्या घरांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड, पेण तालुक्यातील गावांमध्ये पाणी शिरले. या पाण्यात घरातील विजेच्या उपकरणांसह धान्य वाहून गेले. बामणगाव येथील गोठ्यावर पिंपळाचे झाड कोसळल्याने प्रचंड नुकसान झाले. तेथील पशुधनाचे नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे. जिल्ह्यातील आठहून अधिक गोठ्यांचे नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील तीन मोठ्या जनावरांसह दोन शेळ्या, २५ कोंबड्यांची मोठी हानी झाली आहे.

**पंचनाम्याची कारवाई सुरू**

रायगड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील घरांसह शेती, गोठे आदींचे प्रचंड नुकसान झाले. या नुकसानीचे पंचनामे करण्याची कार्यवाही महसूल व कृषी विभागामार्फत सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार यंत्रणा कामाला लागली आहे.

## म्हसळ्यात पावसाचा कहर

आल्याने येथील वाहतूक पूर्णपणे ठप्प पडली होती. लोणेरे गोरेगाव मार्गावरदेखील मोठे झाड पडल्याने या मार्गावरची वाहतूक मोरबेमार्गे वळवण्यात आली होती. त्यामुळे म्हसळा शहराकडे येणारा संपूर्ण प्रवास हा या मुसळधार पावसाने सोमवारी अडवून धरला होता. म्हसळा शहराचीदेखील या पावसात दैना उडाली होती. या पावसात शहराच्या मुख्य प्रवेशद्वारावर पेट्रोल पंपाशेजारी पाणी साचल्याने येथील प्रवाशांची आणि नागरिकांची दैना उडाली. तर दुसरीकडे म्हसळा शहराजवळून वाहणारी जानसई नदीदेखील दुथडी भरून वाहत आहे, त्यामुळे आणखीन पावसाचा जोर कायम राहिला तर ही नदीदेखील आपली पातळी ओलांडून पूरपरिस्थिती निर्माण करण्याची दाट शक्यता आहे. तालुक्यात अद्याप कोणतीही नुकसानी झाली नसली तरी आजूबाजूच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला आहे.

## अखेर 'उमटे'चे भगदाड बुजवले

पातळी ४० मीटर, धरणाची उंची ५६.४० मीटर आहे. धरणाच्या पाण्यावर ४७ गावे व ३३ आदिवासीवाड्या अवलंबून आहेत. धरण तब्बल ४१ वर्षे जुने आहे. निधीअभावी धरणातील गाळ काढण्यास जिल्हा परिषद प्रशासन उदासीन ठरले होते. त्यामुळे एप्रिल मे महिन्यात पाण्याच प्रश्न निर्माण झाला होता. अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक व शेकाप महिला आघाडी प्रमुख तथा सीएफटीआयच्या संचालिका चित्रलेखा पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत धरणातील गाळ काढण्याची तयारी दर्शविली. त्यांच्या प्रयत्नाने धरणातील काही गाळ काढण्यात यश आले. धरणाची दुरुस्ती करण्याबाबतदेखील त्यांनी पाठपुरावा प्रशासनाकडे केला होता. जुन्या असलेल्या धरणाच्या बाह्य बाजूकडील भिंतीचे दगड मोठ्या संख्येने निखळले होते. त्यामुळे भिंतीला भले मोठे भगदाड पडले होते. उमटे धरण संघर्ष समितीचे अध्यक्ष ॲड. राकेश पाटील यांनीदेखील याबाबत निवेदन दिले होते. धरणाची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी २१ जून रोजी उमटे धरणाला भेट दिली. भगदाड पडलेल्या भिंतीची पाहणी केली. भिंतीला पडलेल्या भगदाडाची तातडीने डागडुजी करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देत डागडुजीसाठी आवश्यक निधी जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून उपलब्ध करून दिला होता. त्यानुसार धरणाच्या भिंतीला पडलेल्या भगडादाची डागडुजी करण्यात आली आहे.

उमटे धरणाच्या भिंतीला पडलेल्या भगदाडाची डागडुजी करण्यात आल्याने परिसरातील गावांना दिलासा मिळणार असून, धरणावर अवलंबून असणाऱ्या गावांना सुलभरित्या पाणीपुरवठा सुरू राहणार आहे. डागडुजीचे काम जिल्हा मृद् व जलसंधारण अधिकारी अण्णासाहेब कदम, ग्रामीण पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता सुधीर वेगुर्लेकर, निहाल चवरकर यांच्या देखरेखीखाली पूर्ण करण्यात आले आहे.

## मच्छिमार संकटात

व्यवसायावर अवलंबून आहेत.

जिल्ह्याच्या सहाय्यक मत्स्य व्यवसाय कार्यालयाकडून शासनाकडे वारंवार मागणी करूनही निधी मिळत नाही. शासनाकडे मागविण्यात येणारा निधी आणि जिल्ह्याला प्रत्यक्ष प्राप्त होणारा निधी यात कमालाची तफावत आहे. त्यामुळे परतावा वितरणात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे शासनाने थकीत डिझेल परतावा तातडीने देण्याबाबत उपायोजना कराव्यात, अशी मागणी आ. जयंत पाटील यांनी तारांकित प्रश्नांद्वारे केली.

यावर मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले की, पालघर, ठाणे, मुंबई उपनगर, मुंबई शहर, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग या जिल्ह्यासाठी २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात २६८.७० कोटी रुपयांचा निधी वितरीत केला आहे. त्यात रायगड जिल्ह्यासाठी ६०.८ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

## ॲम्ब्युलन्स खरेदीत महाघोटाळा

वडेट्टीवार यांनी केली आहे. ॲम्ब्युलन्स घोटाळा कोणाच्या पुत्रासाठी केला जातोय, या घोटाळ्यात किती नेत्यांचे खिसे गरम झालेत, असे सवाल करत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी या संपूर्ण प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी विधानसभेत केली आहे.


## नर्सिंग क्षेत्रात करिअरसाठी आता शिष्यवृत्ती, मोफत प्रवेशाची संधी : डॉ. माळी

महाड:- ए. एन. एम. (ANM), . एन. एम. (GNM) व बी. एस्सी नर्सिंग (B. Sc Nursing) हे अभ्यासक्रम १०० टक्के रोजगार देणारे आहेत. या अभ्यासक्रमांना आर्थिक दुर्बल घटकतील विद्यार्थी अधिक प्रमाणात प्रवेश घेत असतात. तसेच या अभ्यासक्रमाला प्रवेश घेणारे विद्यार्थी गरीब आणि शेतकरी कुटुंबातील असतात त्यामुळे त्यांना या अभ्यासक्रमांची फी भरणे शक्य नसल्याने रोजगार देणाऱ्या अभ्यासक्रमपासून वंचित राहावे लागते. परंतु आता नर्सिंग अभ्यासक्रमांसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या घटकांतील विद्यार्थ्यांच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व परीक्षा शुल्क, शिक्षण शुल्क, निर्वाह भत्ता यांकरिता महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे.

या शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक आहे तसेच या शिष्यवृत्तीच्या मदतीमुळे ग्रामीण भागातील सर्व गरजू विद्यार्थ्यांना नर्सिंग करिअरमध्ये भवितव्य घडवण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य न्याय संशोधन संस्था ही एक रायगड जिल्ह्यातील उत्कृष्ट संस्था आहे. तसेच नर्सिंग क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत म्हणून आवडीनुसार करिअर निवडा असे आवाहन संस्थेचे सचिव डॉ. रामलिंग माळी यांनी केले आहे.

सध्याचे वातावरण आणि रोगराईचे प्रमाण पाहता या क्षेत्रात प्रचंड मोठ्या संधी आहे. करोना काळात या सगळ्याचे महत्व आपण जाणलेच. त्यामुळे नर्सिंग हे अनेक मोठ्या संधींनी भरलेले क्षेत्र आहे. ज्यामध्ये सरकारी, निम सरकारी किंवा खासगी रुग्णालये, नर्सिंग होम यामध्ये तुम्ही नोकरी करू शकता. याशिवाय सरकारी आस्थापना, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, आरोग्य गृह अशा ठिकाणीही परिचर आणि परिचारिका यांना उत्तम संधी असते. सध्या या क्षेत्रात वेतनही भरपूर दिले जात आहे. एवढेच नव्हे तर परदेशातही संधी उपलब्ध आहेत.

राष्ट्रीय आरोग्य न्याय संशोधन संस्थेचे नूतन स्कूल ऑफ नर्सिंग नांदगाव हे रायगडमधील लोकप्रिय नर्सिंग महाविद्यालय असून व या महाविद्यालयामध्ये मध्ये ए. एन. एम. (ANM) ०२ वर्षे व जी. एन. एम. (GNM) ३ वर्षे हे दोन्ही शासन मान्यताप्राप्त अभ्यासक्रम सुरू आहेत. नूतन स्कूल ऑफ नर्सिंग मधून आजतागायत ए. एन. एम २००५ पासून ५०० विद्यार्थी तर जी.एन.एम २०११ पासून ४५० विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करून सरकारी, खाजगी रुग्णालय व परदेशतही नोकरीवर रुजू आहेत. तसेच या संस्थेचे रायगड इंस्टीट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन मुरुड-जंजिरा येथे पदवी महाविद्यालय असून येथे जी. एन. एम. (GNM) ०३ वर्षे व बी. एस्सी नर्सिंग (B. Sc Nursing) ०४ वर्षे असे दोन्ही अभ्यासक्रम सुरू आहेत. त्याचप्रमाणे ओम कॉलेज ऑफ नर्सिंग महाड येथे जी. एन. एम. (GNM) ३ वर्षे हा अभ्यासक्रम सुरू आहे. सदर अभ्यासक्रमाला शासन शिष्यवृत्ती देत असल्यामुळे मोफत प्रवेशाची संधी आहे. त्याचप्रमाणे नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांचे किमान वय १७ वर्षे असावे तर कमाल वयाची अट नाही.

नर्सिंग अभ्यासक्रम हे आरोग्यसेवा व्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे आणि त्याची कायदेशीर चौकट ही व्यवसायाला आकार देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. परंतु काही बनावट नर्सिंग कोर्सेस आणि प्रमाणपत्रे देणाऱ्या अनधिकृत संस्थां रायगड व महाराष्ट्रामध्ये आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे करिअर धोक्यात येते. या बनावट नर्सिंग संस्था अपरिचित किंवा मान्यता नसलेले अभ्यासक्रम, अयोग्य प्राध्यापक, पायाभूत सुविधा आणि उपकरणांचा अभाव, अत्याधिक शुल्क व प्लेसमेंट आणि परवाना देण्याची खोटी आश्वासने देऊन विद्यार्थ्यांची फसवणूक करत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व पालकांनी प्रवेश घेत असताना शासन मान्यताप्राप्त संस्थेमध्येच प्रवेश घ्या असा महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यकीय मंडळ मुंबईने विद्यार्थी आणि पालकांना राज्यात कार्यरत असलेल्या फसव्या नर्सिंग संस्थांपासून सावध राहण्याचा इशारा दिला आहे.

नर्सिंग क्षेत्रामध्ये भवितव्य घडविण्यासाठी आजच आपला प्रवेश शासन मान्यताप्राप्त संस्थेमध्ये खाली दिलेल्या नंबरवर फोन करून निश्चित करा.

**नूतन स्कूल ऑफ नर्सिंग (College code- १६)**, नांदगाव, मुरुड-जंजिरा, रायगड ४०२ ४०१, मो. ९२७०२०९५२०, ९८१९०७११९८, ९५४५९८९८३६.

Website: - notannursing.co.in Email ID: - nootannursing@gmail.com Instagram/Facebook ID: - nootan_1839

ADVT

निवडक

## इंदिरा गांधी नगरात वृक्षारोपण

**नेरळ :** माथेरान शहरातील इंदिरा गांधी नगराच्या समोरील मोकळ्या जागेत स्थानिक तरुणांनी पुढाकार घेवून वृक्षारोपण केले. वन विभागाने या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी झाडे उपलब्ध करून दिली तर इंदिरा गांधी नगर भागातील तरुण यांनी एकत्र येऊन ही झाडे लावली. माथेरान शहरातील इंदिरा गांधी नगरमधील स्थानिक रहिवासी एकत्र येत आपल्या विभागात झाडे लावली. माथेरानचे जंगलात वाढणारी अशी करंज आणि विविध प्रकारची जंगली झाडे वन विभागाने उपलब्ध करून दिली होती.

## काव्य दरबार थाटात संपन्न

**उरण :** 'काव्य दरबार' या मराठी साहित्यासाठी कार्य करणाऱ्या उरणच्या साहित्य संस्थेची वार्षिक वर्षा सहल दुधेला डोंगर, चिरले येथे आयोजित करण्यात आली होती. हा कार्यक्रम तीन सत्रात झाला.सहल, कवी संमेलन व स्नेहभोजन असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कवी भ.पो. म्हात्रे, काव्य दरबारचे संस्थापक ज्येष्ठ साहित्यिक काशिनाथ मढवी, विद्यमान अध्यक्ष प्रकाश ठाकूर व प्रमुख अतिथी म्हणून कोमसाप पेण तालुका अध्यक्ष लवेंद्र मोकल हे उपस्थित होते.

## नेत्र तपासणी व गुणगौरव समारंभ

**वाघ्रण :** पेढांबे येथील समाज मंदिरात मोफत नेत्र तपासणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला. लायन्स हेल्थ फाऊंडेशन अलिबाग हाशिवरे खारेपाट रुग्णालय सेवा मंडळ हाशिवरे आणि सेवाश्रम सामाजिक विकास सेवा संस्था वाघ्रण यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी व्यासपिठावर न्यायाधीश अमोल शिंदे,निशांत रौतिले, संतोष दराडे, हरिश्चंद्र पाटील आदी उपस्थित होते.

## आवरे येथे वृक्षारोपण

**उरण :** मर्दनगड परिसर व ब्राम्हण देव मंदिर आवरे येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी आंबा, काजू, फणस,पिंपळ,अशा झाडांसोबतच चाफा, मोगरा, जास्वंदी या फुल झाडांचीदेखील लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाला नागेंद्र म्हात्रे, तुकाराम गावंड, संतोष जोशी, विनायक गावंड, शिवकुमार म्हात्रे, दौलत भोईर, शंकर पाटील, सानिका गावंड, सौरभ पाटील, श्वेदांत ठाकूर, अमित ठोंबरे, विलास ठाकूर आदी निसर्गमित्रांची उपस्थिती लाभली.

## काव्यस्पर्धेचे आयोजन

**नवीन पनवेल :** महाकवी कालिदास दिनाचे औचित्य साधून ब्राह्मण सभा, नवीन पनवेल संस्थेने पाऊस विषयावरील काव्यस्पर्धेचे आयोजन केले. स्व.भाऊसाहेब पुंडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ही स्पर्धा खांदा कॉलनीमधील सी.के.टी महाविद्यालयाच्या सभागृहात ही स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेला पनवेलमधील कवी आणि काव्यप्रेमींचाही प्रतिसाद लाभला. या स्पर्धेमध्ये वरदा जोशी यांनी प्रथम, अपर्णा साठे यांनी द्वितीय, पौर्णिमा दिक्षीत यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

# देवकुंडला 144 कलमाचे लॉक!

**पर्यटकांच्या सुरक्षेसाठी सिक्रेट पॉईंट, ताम्हिणी घाट, देवकुंड परिसरात मनाई**



**| माणगाव | सलीम शेख |**

माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या पर्यटन स्थळी कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून शासनाच्या वतीने खबरदारीची उपाययोजना म्हणून माणगाव उपविभागीय दंडाधिकारी डॉ. संदीपान सानप यांनी माणगांव तालुक्यातील भिरा गावच्या हद्दीतील देवकुंड धबधबा व सणसवाडी गावचे हद्दीतील सिक्रेट पॉईंट, ताम्हाणी घाट व आजुबाजूच्या १ कि.मी. परिसरात ०५ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीसाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करीत १४४ कलमाचे लॉक लावले आहे. त्यामुळे वर्षासहलीसाठी येणाऱ्या उत्साही पर्यटकांच्या उत्साहावर निरुत्साहाचे पाणी पडले आहे.

रवाळजे दूरक्षेत्र अंतर्गत, भिरा गावचे हद्दीतील देवकुंड धबधबा, सणसवाडी गावचे हद्दीतील सिक्रेट पॉईंट व ताम्हाणी घाट येथे कलम १४४ च्या तरतुदी लागू करण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. सदरचा परिसर पावसाळी हंगामात पुणे-मुंबई व महाराष्ट्रातील पर्यटकांचे आकर्षणाचे ठिकाण आहे. हि ठिकाणे नैसर्गिक दुर्गम भागात असल्यामुळेतेथेकोणत्याहीसुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत.

सन २०१७ च्या पावसाळी हंगामात या ठिकाणी भेट दिलेल्या पर्यटकांमधील ४ पर्यटक नदीच्या प्रवाहात वाहत जाऊन मृत्यूमुखी पडले होते. सुमारे ५५ पर्यटक हे अचानक पाण्याचा जोर वाढल्याने नदीचे पात्राचे ठिकाणी अडकले होते. सन २०१८ चे पावसाळी हंगामातदेखील १४४ अन्वये मनाई आदेशाची मुदत संपल्यानंतर ३ पर्यटक हे नदीच्या प्रवाहात वाहून मृत्युमुखी पडले होते.

सन २०२२ मध्ये एक पर्यटक नदीच्या पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने पाण्यात वाहून जाऊन मृत्युमुखी पडला आहे. त्याचबरोबर सिक्रेट पॉईंट या ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेचा अभाव असल्याने पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते व ताम्हीणी घाट हा धोकादायक वळणांचा व तीव्र उताराचा असल्याने तसेच दरड कोसळण्याचा संभव असल्याने पर्यटकांची वित्त व जीवित हानी होऊ शकते. या कारणांमुळे देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट व ताम्हाणी घाट ही पर्यटन स्थळे सुरक्षित नसल्याने या परिसरात मनाई आदेश पारीत केले आहेत.

पावसामुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक धबधब्यांच्या परिसरामध्ये मद्यपान करणे किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे व उघडया जागेवर मद्य सेवन करणे, पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे, धबधबे, दऱ्यांचे कठडे, धोकादायक वळणे, इ. ठिकाणी सेल्फी काढणे व कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे तसेच रहदारीवर परिणाम करणाऱ्या ठिकाणी फोटोग्राफी करणे, रिल्स व्हिडीओ बनविणे, पावसामुळे वेगाने वाहणाऱ्या धोकादायक पाण्यात, खोल पाण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे, धबधब्याच्या वरील बाजूला जाणे अथवा धबधब्याच्या धोकादायकरीत्या पडणाऱ्या पाण्याच्या झोताखाली बसणे, धोकादायक स्थिती निर्माण होईल अगर जीवित हानी होईल, असे धबधबे किंवा तलाव याठिकाणी पाण्यात उतरणे, रहदारीच्या ठिकाणी तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबवणे, वाहने अतिवेगाने व वाहतूकीस अडथळा निर्माण होईल अशाप्रकारे चालविणे, वाहनाची ने-आण करतांना बेदरकारपणे वाहन चालवून इतर वाहनांना धोकादायक स्थितीत ओव्हरटेक करणे, टिंगळटवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे यावर बंधने आणली आहेत.

**महिलांशी असभ्य वर्तन करणे, सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात संगीत यंत्रणा वाजवणे, डिजे. सिस्टिम वाजवणे, गाडीमधील स्पिकर, उफर वाजवणे व त्यामुळे ध्वनीप्रदूषण करणे, ज्या कृतीमुळे ध्वनी, वायू व जल प्रदूषण होईल अशी कोणतीही कृती करणे, धरण, धबधब्याचे १ कि.मी. परिसरात वाहनांना प्रवेश करण्यावर बंदी घालण्यात आली आहे.**

## कार्लेखिंड रस्त्यावर टाकादेवी येथे
# वड कोसळला

**अथक प्रयत्नाने वाहतूक सुरळीत**



**| सोगाव | वार्ताहर |**

अलिबाग तालुक्यातील कनकेश्वर फाटा ते कार्लेखिंड रस्त्यावर ८ जुलै रोजी दुपारच्या वेळी टाकादेवी येथे पावसामुळे वटवृक्ष उन्मळून पडल्याने वाहतूक ठप्प झाली होती. दोन तासांच्या अथक प्रयत्नाने सदर वटवृक्ष बाजूला करण्यात यश आले.

कनकेश्वर फाटा ते कार्ले खिंड दरम्यान टाकादेवी येथे दुपारच्यावेळी एक मोठा वटवृक्ष पावसामुळे उन्मळून पडले होते. यावेळी कोणतीही हानी झाली नाही, मात्र काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. यावेळी रायगड जिल्हा काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष व मापगाव ग्रामपंचायत माजी सरपंच सुनिल दशरथ थळे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेता सुचित थळे यांनी स्वतःच्या जेसीबीच्या सहाय्याने दोन तासांच्या अथक प्रयत्नाने रस्ता मोकळा करत वाहतूक सुरळीत करण्यात यश मिळाले. यावेळी त्यांच्यासोबत अमित थळे, हेमंत थळे, सागर दळवी, प्रज्ञेश दळवी, प्रशांत घरत, जितेंद्र दळवी व इतर सहकारी उपस्थित होते.

याबद्दल या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी व वाहनचालकांनीतसेचयापरिसरातील ग्रामस्थांनी सुनिल थळे, सूचित थळे व सहकाऱ्यांचे आभार मानले.

# तहसीलदारांचे होडी चालवत प्रात्यक्षिक



**| पोलादपूर | वार्ताहर |**

तालुक्यातील उनैसर्गिक आपत्तीवर व भविष्यात उद्भवणाऱ्या पूर सदृश्य स्थितीवर मात करण्यासाठी आज सोमवारी सावित्री नदी पात्रात व सवाद येथील नदीपात्रात पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे यांनी स्वतः होडी चालवून रेस्क्यू टीमला प्रशिक्षण दिले.

यावेळी सीस्केप महाडचे सदस्य व स्थानिक मदत कार्य करणारे तरुण सहभागी झाले. महापुरात रेस्क्यू ऑपरेशन कसे करायचे, मदत कार्य करताना कोणती काळजी घ्यावी लागते याविषयी माहिती आणि मार्गदर्शन तहसीलदार कपिल घोरपडे यांनी केले.महाड शहरात वास्तव्यास असलेल्या या एनडीआरएफ पथकाला पोलादपूर तालुक्यातील आपत्ती काळात पाचारण केल्यानंतर काही वेळातच हे पथक मदतकार्यासाठी उपलब्ध होईल अशी माहिती तहसीलदार घोरपडे यांनी दिली.

# 'पेमास्टर पार्कपर्यंत ई-रिक्षाची सुविधा द्या'

**| माथेरान | वार्ताहर |**

सद्यस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत तेथील रहिवाशांना ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे मग आमच्या पेमास्टर पार्क विभागातील भूमिपुत्रांना ही सेवा का पुरविली जात नाही. त्यासाठी पेमास्टर पार्क पर्यंत ई रिक्षा सुविधा उपलब्ध करून द्या अशी मागणी तेथील रहिवाशांनी नगरपरिषदेच्या कार्यालयात जाऊन लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



माथेरानमध्ये ई रिक्षाच्या माध्यमातून अत्यावश्यक सुविधा उपलब्ध झाली आहे.अनेक आव्हानांचा सामना करत, विरोध पत्करून कोणत्याही परिस्थितीत माथेरानला विकासाकडे नेण्यासाठी ई रिक्षाच्या सुविधेला समस्त ई रिक्षा समर्थकांनी, ग्रामस्थांनी पाठिंबा दिल्यामुळे आज सर्वजण या महत्वाकांक्षी प्रकल्पाचा सहकुटुंब लाभ घेताना दिसत आहेत. परंतु पेमास्टर पार्क विभागात दूरवर राहणाऱ्या माळी कामगारांना या सेवेचा लाभ मिळत नाही.

याबाबत मुख्याधिकारी यांना तीन वेळा लेखी निवेदने देऊनही आजपर्यंत काहीही ठोस भूमिका न घेतल्यामुळे संतप्त रहिवाशांनी पुन्हा एकदा भर पावसात येऊन लेखी निवेदन सादर केले आहे.यावेळी शैलेंद्र दळवी, भालचंद्र सावंत, स्वाती कुमार, उषा पांगसे, प्राजक्ता सनगरे, राजश्री दळवी, रिया दळवी, लीला शिंदे, सुनीता दाभेकर,संगीता जाबरे, अनिता मोरे, नंदकिशोर सनगरे, राकेश मालुसरे, पपू पारधी आदी उपस्थित होते.

**सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार ई-रिक्षा माथेरान शहरात कुठेही जाऊ शकते. परंतु सनियंत्रण समितीच्या सब कमिटीने मार्गिका निश्चित केलेली नाही. दूरवर वास्तव्यास असणाऱ्या भूमिपुत्रांना, माळी कामगारांना ही सेवा मिळणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे रात्री अपरात्री सुध्दा नागरिक आणि पर्यटक दस्तुरी नाक्यावरून गावात येत असतात.मध्यंतरी दस्तुरी भागात बिबट्याचा वावर असल्याबाबत वनखात्याने सूचित केले होते त्यामुळे सर्वांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रात्री उशिरापर्यंत ई रिक्षाची सुविधा उपलब्ध व्हावी अशी मागणी सुध्दा जोर धरू लागली आहे.**

# खंडित वीज पुरवठ्यामुळे वंचित बहुजन आघाडी आक्रमक

**| पाली /बेणसे | वार्ताहर |**

सुधागड तालुक्यात विजेचा लपंडाव सुरु आहे. या खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे सर्वसामान्य जनता व व्यावसायिक हैराण झाले आहेत. त्यामुळे वंचित बहुजन आघाडी आक्रमक होऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पाली वीज वितरण उपअभियंत्यांना निवेदन देऊन जाब विचारला. तसेच मेणबत्ती व दिवा भेट देऊन अनोखे आंदोलन केले. काही काळात वीज पुरवठा सुरळीत न झाल्यास कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा देखील दिला.

सुधागड तालुका हा मागास व ग्रामीण तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यातील सामान्य जनता, विद्यार्थी, कामगार लघुउद्योग, शाळा आदी आस्थापने या विजेवर चालणाऱ्या उपक्रमांवर अवलंबून आहेत. तालुक्यातील ग्राहक नियमितपणे वीज बिल भरत असतात, आणि ते न भरल्यास तातडीने ते आपल्याकडून खंडित केले जाते. वारंवार वीजपुरवठा खंडित करण्यात येत असल्याने येथील जनता त्रस्त आहे. असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदन देतेवेळी वंचित बहुजन आघाडी रायगड जिल्हाध्यक्ष अमित गायकवाड, तालुका अध्यक्ष राहुल गायकवाड, तालुका उपाध्यक्ष चंद्रकांत जगताप, नारायण जाधव, भागवत गायकवाड, प्रशांत गायकवाड, नितेश पवार, बाळाराम गायकवाड व आनंद जाधव आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीराम पुलावरील खड्डे भरले

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत शहरातील उल्हास नदीवर असलेल्या श्रीराम पुलावरील खड्डे पडले होते.त्यामुळे वाहतूक मंदावली होती आणि अपघाताची शक्यता देखील निर्माण झाली होती.मात्र माजी स्वीकृत नगरसेवक संकेत भासे यांनी पुढाकार घेवून पुलावरील ते खड्डे भरून वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली आहे.



गेल्या काही महिन्यांपासून शहरातील श्रीराम पुलावर पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. त्याचवेळी वाहतूक कोंडी, अपघातांची वाढती संख्या आणि प्रवासातील असुविधा यामुळे नागरिक त्रस्त झाले होते. स्थानिकांची अडचण लक्षात घेवून कर्जत पालिकेचे माजी स्विकृत नगरसेवक संकेत भासे यांनी त्वरेने या समस्येची दखल घेतली. त्यांनी संबंधित प्रशासनाशी चर्चा करून तात्काळ खड्डे भरण्याचे आदेश दिले. खड्डे भरण्याचे काम सुरळीत पार पडले आणि त्यामुळे शहरातील मुख्य रस्ते वाहतूक आता सुरक्षित आणि सुलभ प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. आता रस्त्यांवर चालताना आणि वाहन चालवताना खूपच सुरक्षित प्रवास करीत आहेत.

**पनवेल शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने**

# विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेलचे शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार दत्तूशेठ पाटील यांच्या जयंती निमित्त सोमवारी (दि.८) सकाळी ११ वाजता पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शेतकरी कामगार पक्ष आणि माजी आमदार दत्तूशेठ पाटील शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल तालुक्यातील विविध शाळांमधील दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा पार पडला.



सदर कार्यक्रम माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी त्यांनी आपल्या प्रास्ताविकात आज तात्यांची जयंती आणि त्याच दिवशी त्यांच्या संस्थेच्या वतीने हा निश्चित करी कामगार पक्षाच्या वतीने दहावी व बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार दुग्धशर्करा योग असल्याचे सांगितले. यावेळी व्यासपीठावर पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, जे.एम म्हात्रे, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण शेठ घरत. पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देवेंद्र मढवी, माजी नगरसेवक शंकर म्हात्रे, प्रकाश म्हात्रे, पनवेल विधानसभा उपाध्यक्ष अजित अडसूळ, नगरसेवक रवींद्र भगत आदी मान्यवर तसेच पनवेल तालुक्यातील शाळांमधील शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी आमदार दत्तूशेठ पाटील शिक्षण प्रसारक मंडळाचे सीईओ रा. गो पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या शिक्षक कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

## ग्रामीण रंगभूमी प्रभा करंडक एकपात्री स्पर्धा

# गौतमी घरत, तनिष्क आपणकरने पटकावला करंडक

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ७ जुलै रोजी पीएनपी सहकारी सांस्कृतिक कला विकास मंडळ अंतर्गत ग्रामीण रंगभूमीच्या वतीने स्थानिक ग्रामीण भागातील कलाकारांना प्रोत्साहित करण्यासाठी प्रभा करंडक २०२४ एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मोठ्या गटात गौतमी घरत हिने, तर लहान गटात तनिष्क आपणकरने प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत एक ४२ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे उद्घाटन ॲड. मानसी म्हात्रे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आले.

याप्रसंगी ज्येष्ठ अभिनेत्री विजया कुडव, स्पर्धेचे परीक्षक लेखक, दिग्दर्शक, अभिनेते रवि वाडकर आणि भास्कर पाटील, दिग्दर्शक किशोर म्हात्रे, अभिनेते सागर नार्वेकर, अभिनेते योगेश पवार, कीर्तनकार संतोष बोंद्रे, प्रकाश कवळे, सुनील धुमाळ, के.डी. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर एकपात्री स्पर्धा ही अलिबाग, मुरुड, रोहा, पेण आणि उरण तालुक्यातील ग्रामीण भागातील कलाकारांसाठी मर्यादित होती. या स्पर्धेत लहान आणि मोठा गट अशा एकूण ४२ स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत मोठ्या गटाचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस रु. ७०००/- आणि प्रभा करंडक गौतमी घरत हिने पटकावला, तर लहान गटाचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस रु. ५०००/- आणि प्रभा करंडक तनिष्क आपणकर हिने पटकावला.



### चित्रलेखा पाटील यांच्याकडून कौतुक

**ग्रामीण भागातील कलाकार पुढे आले पाहिजेत, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळाले पाहिजे या संकल्पनेतून प्रभा करंडकाचे यशस्वी आयोजन करण्यात आल्याबद्दल चित्रलेखा पाटील यांच्याकडून सर्वांचे कौतुक करण्यात आले. तसेच यापुढेही अशाच पद्धतीने स्पर्धा व्हाव्यात, यासाठी सर्वार्थाने मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.**

### मोठा गट विजेते

**प्रथम क्रमांक गौतमी घरत, द्वितीय क्रमांक सुधीर सावंत, तृतीय क्रमांक स्वप्नाली मोरे, उत्तेजनार्थ कृतीका पाटील, विशेष प्रमाणपत्र तनिष्का नागे, आदेश पवार, श्रीया साखीरकर यांना गौरविण्यात आले.**

### लहान गट विजेते

**प्रथम क्रमांक तनिष्क आपणकर, द्वितीय क्रमांक आराध्य पाटील, तृतीय क्रमांक श्रावणी सुतार, उत्तेजनार्थ अनन्या प्रमाणे, विशेष प्रमाणपत्र स्मंद कोठेकर, विरा नरबेकर यांना गौरविण्यात आले.**

बक्षीस समारंभाप्रसंगी मान्यवर परीक्षक रवि वाडकर आणि भास्कर पाटील यांनी स्पर्धकांना मार्गदर्शन केले. ग्रामीण रंगभूमीचे अध्यक्ष राजन पांचाळ यांनी ग्रामीण रंगभूमीच्या पुढील वाटचाल आणि उपक्रमाची उपस्थितांना माहिती दिली. विक्रांत वार्डे यांनी सदरची एकपात्री स्पर्धा ज्येष्ठ अभिनेत्री कै. लिना ठोंबरे यांच्या स्मृतीस समर्पित केल्याचे जाहीर केले. याप्रसंगी सुनील ठोंबरे, प्रकाश सप्रे, प्रकाश पाटील, आरती पाठक, अश्रीता बारसे, राजू झावरे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ निवेदक आणि ग्रामीण रंगभूमीचे उपाध्यक्ष देवेंद्र केळूसकर यांनी केले. त्यांना तन्वी पाटील-पानकर यांनी साथ दिली. ग्रामीण रंगभूमीचे सचिव प्रतिक पानकर यांनी निकाल जाहीर करुन उपस्थितांचे आभार मानले.

या संपूर्ण कार्यक्रमाच्या नियोजनाचे कामासाठी ग्रामीण रंगभूमीचे पदाधिकारी संकल्प केळकर, मयूर शिंदे, जितेंद्र पाटील, तुषार पाटील, राजू गुरव, राजू झावरे यांनी मोलाचे योगदान दिले. त्याचप्रमाणे निशिकांत कोळसे, दिनेश पाटील, दीपक काळेल, साहील राऊत, आयान बेलोस्कर, अनिष मिठागरी, वरद ठाकूर, हर्षाली सानप, श्रुती टावरी, स्फूर्ती खेऊर, सुबोध पाटील, प्रितेश पाटील यांनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न केल्याबद्दल पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह तथा शेकाप महिला आघाडी रायगड जिल्हा प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी सर्वांचे मनापासून कौतुक केले.

> **"चित्रलेखा पाटील यांच्या संकल्पनेतून ग्रामीण रंगभूमीची स्थापना करून आमचे सर्वांचे प्रेरणास्थान आमदार जयंत पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ग्रामीण भागातील कलाकारांना प्रोत्साहित करण्यासाठी प्रभा करंडक २०२४ एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन केले, त्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले. या ग्रामीण नाट्य चळवळीच्या वाटचालीस शुभेच्छा देताना चित्रपट दिग्दर्शक आणि संगीतकार विक्रांत वार्डे, ग्रामीण रंगभूमीचे अध्यक्ष राजन पांचाळ यांचे अभिनंदन करून त्यांना या कार्यात सहकार्य करण्याचे आश्वासन दिले."**
>
> **- ॲड. मानसी म्हात्रे, माजी नगराध्यक्ष**

# पापांचा वार्षिक हिशेब

मान्सूनच्या पावसाची सर्व भारतीय आतुरतेने वाट पाहत असतात. यंदा उन्हाळा फारच कडक होता व तो लांबलाही फार. त्यामुळे पावसाची मोठी प्रतीक्षा होती. जूनमध्ये त्याने थोडी ओढ दिली. क्वचितच काही ठिकाणी सरासरी गाठली. जुलैच्या प्रारंभाला मात्र ती कसर तो भरून काढतो आहे. पहिल्याच आठवड्यात राज्यातच नव्हे तर देशाच्या बहुसंख्य भागात धुवाँधार बरसात झाली आहे. मात्र पाऊस जेव्हा असा मुसळधारेने पडतो तेव्हा तो जणू मनुष्यमात्रांच्या पापांची झाडाझडती घेतो आणि माणसांना त्याची जाणीव करून देतो. दरवर्षी वार्षिक पाहणी अधिकारी किंवा हिशेब तपासनीस यावेत त्याप्रमाणे तो येतो आणि मनुष्याने गेल्या वर्षभरात निसर्गाची आणखी किती वाट लावली आहे त्याची झाडाझडती घेतो. दरवर्षी तो वेगवेगळ्या ठिकाणच्या लोकांना धोक्याचा इशारा देतो. तिथे मग आकस्मिक पूर येतात. आजपर्यंत जिथे पाणी भरले नाही तिथे घरे, इमारतीच नव्हे तर वस्त्याच्या वस्त्या पाण्याखाली जातात. त्यामुळे एक वर्ष मुंबईत एका दिवसात ९१० मिलीमीटर पाऊस होतो. दोन-तीन वर्षे कोल्हापूर, सांगलीत कृष्णा, पंचगंगा दहशत निर्माण करतात. पुण्यात नदीकाठानेराहणाऱ्यांना दरवर्षी किमान एकदा फटका बसतो. पंढरपूर, औरंगाबाद, नागपूर अशा अनपेक्षित ठिकाणी पुराच्या वाढत्या घटना घडतात. माणूस म्हणतो ढगफुटी झाली. पण तो खरे पावसाचा इशारा असतो. त्या त्या ठिकाणी माणसाने निसर्गाची जी मोडतोड केलेली असते त्याचा तो पंचनामा असतो. गेल्या दोन दिवसात राज्यात मुंबई आणि कोकणात हा कार्यक्रम पार पडला. यंदा सिंधुदुर्ग आणि रायगडात ढगफुटी झाली. तळकोकणातकुडाळ, ओरोस, सावंतवाडी परिसरात रस्ते, घरे, वाड्या पाण्याने भरून गेल्या. रायगडात महाड, म्हसळा, अलिबाग, मुरुड इत्यादी तालुक्यांना फटका बसला. अलिबागजवळ रामराज, उमटे, बोरघर, नेहुलीमध्ये पाणी घुसून लोकांचे नुकसान झाले. तिकडे पनवेल आणि नव्या मुंबईतही पावसाने दणका दिला.

## विकासाचे राक्षसी मॉडेल

यंदाच्या हंगामातील ही पहिली सलामी आहे. अजून तीन महिने बाकी आहेत. मुंबईत पहिल्या पावसाने साधारणपणे लोकल व रस्ते वाहतूक कोलमडतेच. तसेच झाले. जागोजाग पाणी भरले. हिंदमाता परिसरात जमिनीखाली मोठ्या साठवण टाक्या बांधल्याचे शिंदे सरकारचे दावे फुसके ठरले. मुंबईत सध्या मेट्रो तसेच फ्लायओव्हरची असंख्य कामे चालू आहेत. याखेरीज आरेकॉलनी, संजय गांधी उद्यान या मोकळ्या जागांवरील घुसखोरी वाढली आहे. एक इंचदेखील मोकळी जागा सोडायची नाही असा चंग बिल्डर आणि सरकारने बांधला आहे. त्यामुळे पाऊस पडल्यावर तो वाहून जायला जागाच शिल्लक राहिलेली नाही. मग हे पाणी रस्ते व रेल्वेमार्गांवर येते. आता मुंबईत जागोजाग भुयारी रस्ते तसेच भुयारी पार्किंग करण्यात आलेली आहेत. मेट्रो रेल्वेचा पुढचा टप्पा भुयारीच आहे. येत्या दोन महिन्यांत ही रेल्वे सुरू व्हायची आहे. समजा पाण्याचे लोंढे या भुयारांमध्ये गेले व तेथे पूरसदृश स्थिती निर्माण झाली तर काय याचे उत्तर कोणाकडेही आहे असे वाटत नाही. आर्किटेक्ट व इंजिनिअर्स यांनी काहीही दावे केले तरी त्यावर कितपत विश्वास ठेवावा असा प्रश्न आहे. कारण, दक्षिण मुंबईतील भुयारी मार्गाचे उद्घाटन झाल्याझाल्या त्यात पाणी गळती होऊ लागल्याचे उघड झाले होते. शिवडी-न्हावाशेवा मार्गाचा अधिक वापर नसूनही तेथे खड्डे पडल्याचे दिसून आले होते. त्यामुळे शहराचे नियोजक खरे सांगतच असतील असे नाही. मुंबईत एकेकाळी गर्दी कमी करण्याची आणि येथील उद्योग बाहेर नेण्याची चर्चा होत असे. आता मात्र लोअर परेल आणि वांद्रे-कुर्ला संकुल येथील कार्यालयांच्या निमित्ताने गर्दी अधिकच वाढवण्यात आली आहे. त्यातच आता विकसित धारावीच्या आधुनिक इमारतींची भर पडणार आहे. इतरत्रही सत्तर-ऐंशी मजली इमारतींचे पुंजके उभे राहत आहेत. हे भयावह चित्र आहे.

## पूर्ण किनारपट्टी धोक्यात

बाकीची शहरेच नव्हे तर गावांमध्येही आता मुंबईसारखाच विकास करण्याची चढाओढ सुरू झाली आहे. छोट्या गावांमध्येही सांडपाणी निचरा, पाण्याची सोय, रस्ते इत्यादी लक्षात न घेता दणादण इमारती उभ्या केल्या जात आहेत. आजवर आडवे असणारे अलिबागसारखे टुमदार शहरही आता झपाट्याने उभे होऊ लागले आहे. तिकडे मुंबई किंवा पालघरमध्ये भराव टाकून नवीन इमारती, पूल किंवा बंदरे उभी राहत आहेत. त्यामुळे मग समुद्राचे पाणी रायगड किंवा अन्य भागांमध्ये आत घुसू लागले आहे. पावसामध्ये पाण्याच्या निचऱ्याला जागा उरलेली नाही. दरवर्षी एखाद्या वेळी पावसात असे होणारच असे वाटणारे लोक मूर्खांच्या नंदनवनात राहत आहेत असे म्हणायला हवे. पाऊस दरवर्षी वेगवेगळ्या रीतीने आपल्याला इशारे देत आहे. पण आपण डोळ्यावर कातडे ओढून आपले व्यवहार तसेच चालू ठेवू पाहत आहोत. समुद्रालगतच नव्हेसह्याद्रीच्या उंचच उंच रांगांमध्येही विकास करण्याचा रोग आपल्याला जडला आहे. सह्याद्रीच्या शिखरांवरफार्महाऊस, बोगदे इत्यादी बांधण्यासाठी डोंगर व झाडांची कत्तल चालू आहे. पाणी धरून ठेवणारी व्यवस्था नष्ट होते आहे. त्यातून इरशाळवाडी किंवा माळीणसारख्या दुर्घटना घडत आहेत. त्यावर तात्पुरती मलमपट्टी करून आपण पुढे जाऊ पाहतो आहोत. पण एक दिवस विकासाचा भस्मासुर आपल्यावर उलटणार आहे. कर्करोगाप्रमाणे आपल्याला गिळून टाकणार आहे. आज पर्यटनाच्या नावाखाली रायगड जिल्ह्यात पर्यायी किनारी मार्गांचे प्रस्ताव आणले जात आहेत. त्यामुळे शेतजमीन तर नष्ट होणार आहेच, पण निसर्गाचा समतोलही बिघडणार आहे. आज थोडा काळ यातून काही जणांना पैसा मिळाला तरी अंतिमतः हा विकास सगळ्यांच्याच मुळावर येणार आहे. दरवर्षी पावसाळ्यात येणारे पूर हे त्याचे पहिले लक्षण आहे. २०५० पर्यंत अर्धीअधिक दक्षिण मुंबई पाण्याखाली जाईल असा इशारा मुंबईचे माजी पोलिस आयुक्त इक्बालचहल यांनी दिला होता. ही वेळ रायगडसह पूर्ण कोकणपट्टीवरच ओढवू शकते. हा सर्वांच्याच जीवनमरणाचा प्रश्न आहे.

विचार

# विलंबास कारण की...

*सलग तिसऱ्यांदा अंतराळ सफर करुन विक्रम प्रस्थापित करणाऱ्या भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स सहकाऱ्यासह अंतराळ स्थानकात अडकल्यामुळे चिंतेचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यांना घेऊन गेलेले 'बोईंग'चे स्टारलाइनर अवकाशयान कधी परतणार हे कोणी निश्चित सांगत नाही. अगदीच अडचणीच्या प्रसंगी 'स्पेस एक्स' त्यांना वाचवण्यासाठी पुढे येऊ शकते. मात्र ही वेळ टाळण्याचा प्रयत्न असेल.*



**पंकजा देव**

भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांनी तिसऱ्यांदा अंतराळ स्थानकात प्रवेश करुन एक आगळा विक्रम नोंदवला आणि अंतराळ संशोधकांबरोबरच समस्त भारतीयांची मनेही अभिमानाने फुलून आली. मात्र 'स्टारलाइनर स्पेसक्राफ्ट इंटरनॅशनल स्पेस स्टेशन' (आयएसएस) मधील त्यांचा मुक्काम लांबल्यामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सुनीता विल्यम्स आणि बुश विल्मोर यांना अंतराळात जाऊन जवळपास महिनाभराचा कालावधी उलटला आहे. मात्र अद्यापही 'नासा' आणि 'बोईंग'चे स्टारलाइनर अवकाशयान कधी परतणार हे निश्चित सांगता येत नाही. प्रत्यक्षात हे मिशन अवघ्या आठ दिवसांचे असल्याचे सांगण्यात आले होते. त्यानुसार हे दोघे अंतराळवीर १४ जून रोजी परत येणे अपेक्षित होते. मात्र अंतराळयान स्पेस स्टेशनवर नेत असताना हेलियम वायूची गळती झाली आणि 'थ्रस्टर्स' मध्ये काही बिघाड झाला. अर्थात अंतराळ संस्थेच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार यान पूर्णपणे सुरक्षित असून अंतराळवीरांना परत आणण्यात कोणतीही अडचण नाही. मात्र असे असले तर त्यांना परत का आणले जात नाही, हा प्रश्नाचे उत्तरही मिळायला हवे.

यापूर्वी रशियाचे अंतराळवीरही असेच अवकाशात अडकले होते. परंतु वेळ न दवडता त्यांनी दुसरे यान पाठवून अंतराळवीरांना परत आणले होते. मात्र सध्या वेळ दवडला जाताना दिसतो आहे. सुनीता आणि विल्मोर यांच्या परतण्याचे वायदे करूनही त्यांना परत आणण्याचे प्रयत्न होताना दिसत नाहीत. सुनीता यांच्या नावावर सर्वाधिक काळ अंतराळात राहण्याचा विक्रम आहे. मात्र आता या अंतराळवीरांची सुटका करणे आवश्यक आहे. त्यामुळेच त्यांना परत आणण्यासाठी तारीख निश्चित करणे गरजेचे आहे. 'स्टारलाइनर क्रू फ्लाइट टेस्ट स्पेसक्राफ्ट' ही एक 'स्पेस कॅप्सूल' आहे. ती बोईंग कंपनीने बनवली असून प्रवाशांना लो-अर्थ ऑर्बिटमध्ये नेण्यासाठी सोयिस्कर असे तिचे डिझाइन आहे. निम्न पृथ्वीकक्षाची श्रेणी पृथ्वीपासून सुमारे दोन हजार किलोमीटर इतकी आहे. 'नासा' च्या म्हणण्यानुसार ही उंची इतकी कमी आहे की इथून पृथ्वीशी सहज संपर्क साधता येतो. तेथून पृथ्वी पाहता येते आणि आवश्यक वस्तूही पाठवता येतात. इथे हेदेखील लक्षात घ्यायला हवे की, अमेरिकन कंपनी बोईंगने 'नासा'च्या कमर्शियल क्रू प्रोग्रामच्या सहकार्याने हे स्टारलाइनर बनवले आहे. संबंधित वाहन एकावेळी सात जणांना घेऊन जाऊ शकते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही कॅप्सूल दहा वेळा वापरली जाऊ शकते आणि प्रत्येक वापरानंतर ती पुन्हा वापरण्यायोग्य बनवण्यासाठी अवघे सहा महिने लागतात.

आता स्टारलाइनर अंतराळयान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पाठवण्यात आले आहे. ते आठ दिवस तिथे राहील अशी आधीची योजना होती. या काळात अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुश विल्मोर हेदेखील अंतराळ स्थानकावर राहतील, असे ठरले होते. अनेक देशांतील शास्त्रज्ञ या स्पेस स्टेशनमध्ये संशोधनासाठी एकत्र काम करत असल्याचे आपण जाणतो. स्टारलाइनर अंतराळयान अंतराळवीरांना घेऊन जाण्यास आणि त्यांना परत आणण्यास सक्षम असल्याचे सिद्ध करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. पण स्टारलाइनर लॉन्च झाल्यापासूनच अनेक समस्या समोर आल्या आहेत. त्याच कारणामुळे ही मोहीम पुढे ढकलण्यात आली. सुरुवातीला वाहन सहा मे रोजी प्रक्षेपित होणार होते. मात्र प्रक्षेपणाच्या अवघ्या दोन तास आधी उलटी गणती अचानक थांबवावी लागली. 'ॲटलस व्ही' च्या वरच्या भागात बसवलेल्या प्रेशर व्हॉल्व्हमध्ये काही बिघाड झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतरही अशाच काही तांत्रिक अडचणींमुळे प्रक्षेपण आठवडाभर लांबणीवर पडले. अखेर पाच जून रोजी यान प्रक्षेपित करण्यात आले. खरे पाहता अंतराळयान ॲटलस व्ही रॉकेटमधून स्टारलाइनर सोडण्यात येत असतानाच म्हणजेच प्रक्षेपणापूर्वीच मिशन टीमने हेलियम वायूची गळती झाल्याचे शोधून काढले होते. पण त्या वेळी ही एवढी मोठी अडचण मानली गेली नाही. सहाजिकच लाँच थांबवण्याचे पाऊल उचलले गेले नाही. विशेष बाब म्हणजे आताही मिशन टीमला याबद्दल कोणताही पश्चाताप नाही, कारण नासा आणि बोईंगसाठी हे फक्त चाचणी उड्डाण आहे. त्यांचा उद्देश डेटा संकलित करणे हा आहे. तो साध्य झाल्यास भविष्यातील मोहिमांसाठी स्टारलाइनरमध्ये आणखी काही सुधारणा करता येतील. ते पूर्वीपेक्षा अधिक चांगले बनवता येईल. हे सगळे असले तरी प्रक्षेपणाआधी दिसलेल्या हेलियम वायूची गळतीकडे गांभीर्याने बघणे गरजेचे होते, असे काही तज्ज्ञ सांगतात. अंतराळ स्थानकाच्या दिशेने जाताना यानात आणखी जास्त प्रमाणात हेलियम वायूची गळती दिसून आल्याचे बोलले जाते. 'थ्रस्टर्स' मध्येही काही समस्या होत्या. आता सुनीता विल्यम्स आणि बुश विल्मोर यांना परत आणण्यास विलंब होण्यामागील हेदेखील एक महत्त्वाचे कारण आहे.

'बोईंग' आणि 'नासा' ला न्यू मेक्सिकोमध्ये काही ग्राउंड चाचण्या घ्यायच्या आहेत. मात्र त्यासाठी स्टारलाइनरचे काही थ्रस्टर्समध्ये (रॉकेटला मार्गदर्शन करणारे उपकरण) झालेला बिघाड दूर करावा लागेल. मिळालेल्या माहितीनुसार पाच पैकी चार थ्रस्टर्सची दुरुस्ती करण्यात आली आहे; परंतु एक अद्याप नादुरुस्त आहे. त्यामुळेच त्याचे काम थांबले आहे. याबाबत बोलताना 'नासा' च्या 'कमर्शियल क्रू प्रोग्राम'चे व्यवस्थापक स्टीव्ह स्टिच म्हणाले की, अंतराळवीर कधी परत येतील हे सांगता येत नाही. स्टारलाइनर परत आणण्यास उशीर होण्याचे आणखी एक कारण म्हणजे समस्या कोठे आहे हे अद्याप पूर्णपणे ज्ञात झालेले नाही. या कमर्शियल प्रोग्रामचे उपाध्यक्ष आणि प्रोग्राम मॅनेजर मार्क नप्पी यांच्या म्हणण्यानुसार, या समस्येच्या खऱ्या कारणांचा शोध घेण्यासाठी अभियंते सातत्याने प्रयत्नशील आहेत. मात्र हे सगळे असले तरी आता सुनीता विल्यम्स आणि बुश विल्मोर यांचे पुढे काय होणार हा सर्वात मोठा प्रश्न आहे. अर्थात त्यांना सध्या कोणताही धोका नाही. पुढचे काही महिने सुरक्षित आणि सहज राहू शकतील इतकी पर्याप्त सामग्री आणि आवश्यक त्या सर्व गोष्टी अंतराळ स्थानकावर उपलब्ध आहेत. मात्र एखादी मोठी समस्या उद्भवली तर आणीबाणीच्या परिस्थितीत त्यांना परत आणले जाऊ शकते. अर्थातच हा निर्णय परिस्थिती किती गंभीर आहे, यावर अवलंबून असेल. थोडक्यात या सगळ्या अकल्पित घडामोडींमुळे सुनीता विल्यम्स आणि विल्मोर हे पृथ्वीपासून ४०० किलोमीटर उंचीवर असलेल्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात अडकून पडले आहेत. 'डायप्रॉक्स मीडिया रिपोर्ट्स' मध्ये म्हटले आहे, की स्पेस एक्स ही संस्था दोन्ही अंतराळवीरांना वाचवण्यासाठी पुढे येऊ शकते. 'स्पेस एक्स' कडे अंतराळ मोहिमांमध्ये अडकलेल्या अंतराळवीरांना पृथ्वीवर सुरक्षित परत आणण्याचे नैपुण्य आहे; मात्र त्याची मदत घ्यायची, की नाही याचा अंतिम निर्णय 'नासा'ला घ्यावा लागणार आहे. रशियादेखील एक पर्याय समोर ठेवला आहे. त्यामुळेच रशियाशी चर्चा झाली तर त्याचे सोयुझ अंतराळयानही अडकलेल्या दोन्ही अंतराळवीरांना परत आणू शकेल. गेल्या वर्षी रशियानेही हे केले होते. मात्र दोन्ही अंतराळवीरांना परत आणण्याची जबाबदारी 'स्पेस एक्स' वर सोपवली जाईल का, हाच मूळ प्रश्न आहे. याचे कारण म्हणजे 'बोईंग' आणि 'स्पेस एक्स' एकमेकांचे स्पर्धक आहेत. त्यामुळे अगदीच अपरिहार्य उद्भवल्याखेरीज असा निर्णय घेतला जाणार नाही.

सुनीता आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या परतीला लागत असलेल्या विलंबाबाबत 'इस्रो'चे प्रमुख एस सोमनाथ यांनीदेखील मत व्यक्त केले आहे. त्यांनीही सुनीता विल्यम्सचे पुनरागमन ही चिंतेची बाब नसल्याचे स्पष्ट केले आहे. अंतराळ स्थानक हे तिथे गेलेल्यांसाठी दीर्घकाळ राहण्याचे एक सुरक्षित ठिकाण आहे. खेरीज सुनीता यांना स्थानकात राहण्याचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यामुळेच त्या पुढचे काही महिने अंतराळात राहू शकतात. त्यामुळेच अंतराळवीरांच्या पुनरागमनाची चिंता करण्याऐवजी नवीन क्रू मॉड्युल आणि अंतराळात प्रवास करण्याची क्षमता तपासण्यावर भर द्यावा, यावर 'इस्रो' प्रमुखांनी सांगितले आहे. सुनीता यांच्या नावावर अनेक विक्रम आणि मिशनची नोंद आहे. खरेतर नवीन अंतराळ यानाच्या पहिल्या उड्डाणात प्रवास करणे ही एक धाडसी गोष्ट आहे. मात्र त्या स्वतः डिझाईन टीममध्ये सहभागी आहेत. हे काम करताना त्यांनी आपल्या आधीच्या अनुभवातून आलेल्या अडचणींचे निवारण करण्याचा प्रयत्नही केला आहे. त्यामुळेच 'नासा'चे 'कमर्शियल क्रू प्रोग्राम मॅनेजर' स्टीव्ह स्टिच यांनी म्हटले आहे, की आम्हाला ते दोघे परतण्याची अजिबात घाई नाही. मात्र 'स्पेस एक्स'ने दोन्ही अंतराळवीरांना परत आणल्यास बोईंगच्या स्टारलाइनर प्रकल्पाला मोठा धक्का बसेल, हे देखील नाकारण्यात अर्थ नाही कारण या अंतराळयानाच्या विकासावर बोईंगने प्रचंड वेळ आणि पैसा खर्च केला आहे. खेरीज दोघांनाही स्टारलाइनरवरूनच परत आणले गेले, तर समस्या नेमकी कोठे आली हे शोधणे कठीण होईल कारण परत येताना सर्व्हिस मॉड्यूलचा काही भाग जळून नष्ट होईल. त्यामुळे हा धोकाही लक्षात घेण्याजोगा आहे.

आजकाल

# आर्थिक धोरणकर्ते धूळफेक करत आहेत



**संजीव चांदोरकर**

बीबीसीच्या वार्तांकनाप्रमाणे अमेरिकेतील गरिब कुटुंबे दररोजच्या वापरातील अन्न धान्य, किराणा माल, दूध वगैरे वस्तू देखील क्रेडिट कार्ड आणि कर्ज काढून विकत घेत आहेत.

अमेरिकेतली आजची कथा भारतातील उद्याची कथा असणार आहे ; उद्याची कशाला. आज देखील अनेक कुटुंबे खावटी साठी मिळेल तेथून कर्जे काढत आहेत.

भारतात बॉटम ऑफ पिरॅमिड कुटुंबांची उपभोग पातळी , कनझंपशन कमी होत आहे. विशेषतः ग्रामीण भागात. गरीब अजून गरीब होत आहेत. त्याचे महत्वाचे कारण शेती क्षेत्रातील अनेक दशकांचे अरिष्ट.

याचा खूप मोठा फटका सत्ताधारी भाजपला या निवडणुकीत बसला आहे. त्यातून मिळालेल्या धड्याचे प्रतिबिंब पाडणार आहे. दोन आठवड्यानंतर जाहीर होणाऱ्या अर्थसंकल्पात बॉटम ऑफ पिरामिड मधील कोट्यावधी कुटुंबांची क्रयशक्ती वाढवण्यावर भर दिला जाईल अशा चर्चा आहेत. कोणत्याही प्राथमिक गरीब, ग्रामीण वां शहरी, कुटुंबाचे क्रयशक्ती दोन मार्गाने वाढवता येते

एक) कृत्रिमपणे क्रयशक्ती ताबडतोबीच्या काळात वाढवणे. त्या कुटुंबाला मुक्त हस्ते उपभोगासाठी कर्ज उपलब्ध करून देणे. त्याला कृत्रिमपणे असे म्हणतात कारण ते कर्ज फेडायचं असते. असे कर्ज फक्त वेतन किंवा आमदनीतूनच फेडले जाऊ शकते. आधीच्या डोक्यावरील कर्ज फेडण्यासाठी नवीन कर्ज घेणे याला कर्जाची परतफेड म्हणता येत नाही त्याला कर्ज सापळ्यात अडकणे असे म्हणतात किंवा दोन) कुटुंबातील प्रौढ स्त्री-पुरुषांना त्यांच्या शिक्षण, कौशल्य, वकुबाप्रमाणे रोजगार मिळतील. किंवा ते जर स्वयंरोजगारी असतील तर त्या छोट्या धंदा व्यवसायातून त्यांना पुरेशी आमदनी मिळेल यासाठी आर्थिक धोरणे आखणे. जमिनीवर आधारित शेतीसारख्या उपजीविका मिळवणाऱ्या कुटुंबांना स्वयंपूर्ण करणे.

गेल्या काही वर्षात केंद्र सरकरतर्फे, रिझर्व्ह बँकेच्या मदतीने ज्या योजना गरिबांसाठी राबवल्या त्यात विविध वित्तसंस्था मार्फत त्यांना मुबलक कर्जे कशी मिळतिल यावर अतोनात भर दिला गेला आहे.

त्यात काही मूलभूत बदल होतील याची शक्यता कमीच आहे. आर्थिक धोरण कर्ते धूळफेक करत आहेत

क्रेडिट कार्ड आणि कमी व्याज दराने मुक्तहस्ते दिलेली रिटेल लोन्स ही वेतनाला, स्वयं रोजगारातून मिळणाऱ्या पुरेशा आमदनीला कधीही, लेट मी रिपीट, कधीही पर्याय असू शकणार नाही आहेत. त्यातून ही कुटुंबे आयुष्यभर आणि खरे तर पिढ्यानपिढ्या कर्जबाजारी राहणार आहेत

उद्या रिटेल क्षेत्रातील कुटुंबांना दिलेल्या कर्जांमध्ये थकीत कर्जांचे प्रमाण वाढले तर सार्वजनिक पैशातून पुन्हा एकदा बँका आणि वित्त संस्थांना बेलाऊट करण्यात येईल हे नक्की

प्रत्येक प्रौढ स्त्री-पुरुषाच्या हाताला काम आणि कामाला वाजवी दाम हीच मागणी आणि दिशा असली पाहिजे अध्यक्ष महोदय हे बघा गरिबांना सारखे सारखे गरीब गरीब म्हणून ते त्यांची संभावना करत आहेत.

गरीब लोक तर क्रेडिट कार्ड, रिटेल लोन, मायक्रो लोंस, डिजिटल लोन मार्फत आपला उपभोग वाढवत आहेत. ते जसे सांगत आहेत तसे ते गरीब राहिलेले नाहीत, महोदय.

..नाय, नाय नाय, ..क्रेडिट कार्ड म्हणाजे वेतन आणि आमदनी नाही. ..नाय, नाय नाय, मुक्तहस्ते दिलेली मायक्रो , रिटेल लोन , डिजिटल लोन म्हणजे वेतन आणि आमदनी नाही

नाय, नाय , नायकोणतेच कर्ज, शेती तून मिळालेल्या पुरेशा उत्पन्नाला, रोजगरातून मिळणाऱ्या वेतानाला आणि स्वयंरोजगार, छोटा उद्योग व्यवसायातून मिळणाऱ्या आमदनी साठी पर्याय होऊ शकत नाही.

लोकसंसद

## राजकारण व्यवसाय बनतं आहे का ?

मागील काही वर्षांत सर्वच प्रस्थापित राजकीय पक्षांनी निष्ठा, संसदीय व्यवस्थेचे संकेत, राजकीय भूमिका आणि पावित्र्य यांचा पार तमाशा करुन टाकला आहे अनेक नेत्यांनी आपल्या राजकीय दुकानदारीसाठी पक्षांतर करुन आश्चर्याचा धक्का दिला आहे त्यामुळे संपूर्ण राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे जनता लोकप्रतिनिधींना आपल्या मुलभूत समस्यांचा निपटारा व्हावा म्हणून निवडून दिलेली असते मात्र लोकप्रतिनिधी सत्तेच्या लालसेपोटी सर्वकाही विसरुन राजकीय परिवर्तन घडवून आणतं आहेत त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये रोष निर्माण होवून राजकीय नेत्यांवरील विश्वासचं उडाला आहे ईडी, सीबीआय, एनसीबी या तपास यंत्रणा राजकारण्यांच्या मागे लावणे,फोडाफोडीचे राजकारण करण्यात अनेकजण गुंतले आहेत असले सगळे प्रकार करायला यांना वेळ आहे मात्र जनतेच्या मुलभूत सुविधांची आणि समस्यांची सोडवणूक करण्यासाठी वेळ नाही हि शोकांतिकाच म्हणावी लागेल सद्या महागाईने देश होरपळत आहे काही ठिकाणी अतिवृष्टीने तर कुठे पाऊस नसल्याने पिकपाण्याची समस्या निर्माण झाली आहे याकडे मात्र लक्ष द्यायला कोणाला वेळ नाही राजकारण व्यवसाय बनतं आहे का? असा देखील सवाल उपस्थित होत आहे

**- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१० जुलै**

**१८८६:-** संतकवी नारायणबोवा जातवणकर यांचे निधन. हठयोग, ध्यानोपासना इ. अभ्यासक. 'सजसागर' या अध्यात्मावर 'ज्ञानसागर', 'विज्ञानसागर', 'कैवल्यसागर', 'आनंदसागर', 'शांतिसागर', 'करुणासागर' आणि बोधसागर या सजकरणातून मनुष्याचे कर्तव्य, कर्म व ज्ञानाही साधनांपेक्षा श्रेष्ठ असे भक्तीमहात्म्य, सद्गुरुपदे, आत्म स्वरुपबोध, शांत पुरुषांची लक्षणे आदी विषयांवर चर्चा केली आहे. याशिवाय 'गुरुपादुकापटक', 'बोधाष्टक', 'दत्ताष्टक', 'निर्वाणपंचक', 'सुविचारमाला' ही स्फूट करणात्मक रचनाही त्यांची काशित झाली आहे. तसेच त्यांनी पदे व अभंग यांनीही रचना केली आहे. **१९०३:-** वासवर्णनकार, समीक्षक रामचंद्र भिकाजी जोशी यांचा जन्म. 'मजल दरमजल', 'वाटचाल' आदी त्यांची स्थलवर्णनात्मक पुस्तके. 'काचेचे कवच', 'झम्मत' हे त्यांचे कथासंग्रह तर 'वाताहत' ही कादंबरी. 'सोन्याचा उंबरठा' हे व्यक्तिचित्रणपर पुस्तक तर 'साठवणी' हे स्वत:च्या जीवनातील आठवणीचे पुस्तक म्हणजे त्यांचे आत्मचरित्राच होय. **१९१८:-** कथाकार, एकांकिकाकार, समीक्षक चारुशीला बाळकृष्ण गुप्ते यांचा जन्म. 'आजची मराठी कविता', 'मराठी साहित्यदर्शन' ही पुस्तके त्यांच्या मराठी वाङ्:मयीन अभ्यासाची साक्ष देतात. **१९१८:-** लेखक, पत्रकार गंगाधर शंकर इंदुरकर यांचा जन्म. 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ-काल, आज आणि उद्या' या ग्रंथासह 'दिल्ली दिनांक' या पुस्तकातून आपल्या पत्रकारितेच्या आठवणी त्यांनी साकारला आहे. **१९२३:-** मराठी साहित्यात रुपकथाकाराला एका वेगळया उंचीवर नेऊन ठेवणारे ख्यातनाम कथाकार जी. ए. कुलकर्णी यांचा जन्म. ४५ रुपककथा लिहिणाऱ्या जी. ए च्या नावावर 'बखर बिम्मची', 'ओंजळधारा', 'अमृतफळे' असे मोजकेच बालसाहित्य. 'निळासावळा', 'पारवा' मिळून ८ कथासंग्रह. 'रान', 'गाव', 'शिकार', 'स्वातंत्र्य आले घरात', 'एक अरबी कहाणी' ही अनुवादीत पुस्तके आणि 'अरभाट आणि चिल्लर' हे आत्मनिवेदनात्मक पुस्तक अशी विपूल साहित्य निर्मिती त्यांनी केली. **१९२९:-** लेखक कॉ. पी. डी. दिघे यांचा जन्म. ट्रेड युनियनवर बेतलेले 'ट्रेड युनियन चळवळ : स्वरुप, धोरण व व्यवहार', 'महाराष्ट्रातील सामाजिक सांस्तिक चळवळ', 'आगरकर-टिळक व समाजसुधारणा', 'नवीन आर्थिक धोरणाविरुध्द व धर्मांधतेविरुध्द युध्द', 'वसाहतिक समाजातील सांस्तिक बंड', 'दोन कर्मवीर', 'बोधन संघटन संघर्ष', 'महर्षी विल रामजी शिंदे यांचे आर्थिक आणि सांस्तिक विचार' मिळून सामाजिक बांधीलकी जपणारी आठ पुस्तके त्यांनी लिहिलीत. **१९४१:-** साहित्यिक संपादक अनिल रमेश दहिवाडकर यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत 'काळा सूर्य', 'आच्छादन', 'मृत्यूवेध' या कादंबऱ्या. 'अश्रुंची दरी', 'दैनंदिन उपासना गीते' हे काव्यसंग्रह तसेच 'जंग बहादूर रावसाइब कवडे', 'टिंकू, शिटू, पिंटू केदार', 'एक होता कोंबडा' ह्या बालकथा, 'वाळक्या ही भित्रा', 'म्हातारीचा डोंगर' ह्या बालकथा, 'झमझम माया' बालकविता असे विपूल माणात बालसाहित्य सिध्द. **१९४४:-** साहित्यिक डॉ. भा. व्यं. गिरधारी यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथसंपदेत 'अभिव्यक्ती', 'आलेख', मराठी साहित्यातील 'ययाती, कर्ण आणि मराठी तिभा', 'आरसा आदिवासी जीवन शैलीचा', 'मराठी लेखन शुध्दी' या पुस्तकांसह चार संपादने त्यांच्या नावावर आहेत. तसेच 'ना. गोखले चरित्र', 'पी एच् डी बंध रुपरेषा आणि निष्कर्ष' आणि 'मध्यभारतातील दुर्गा स्तोत्र' हे त्यांचे अन्य ग्रंथ. **१९४५:-** साहित्यिक डॉ. हेमष्ण शामराव काफाते यांचा जन्म. ह्यांच्या ग्रंथसंपदेत 'वास्तव' हा काव्यसंग्रह, 'चारोळ्यांचा चारा', 'छान छान चारोळ्या' हा चारोळी संग्रह. 'जीवनदायिनी लाखोळी' या माहितीपर ग्रंथासह 'शामराव बापू : एक स्मरणगंध' हा चरित्रवजा संपादित ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. **१९६५:-** इतिहास संशोधक आनंदराव भाऊ फाळके यांचे निधन. शिंदेशाहीच्या इतिहासची साधने हे फाळके यांचे महत्त्वाचे कार्य. यातून शिंदे राजघराण्याचा पत्रव्यवहार आठ खंडांत सिध्द केला. **१९६८:-** लेखक अंबादास विठ्ठलराव केदार यांचा जन्म. 'येस्कर', 'चिपाड' या कथासंग्रहासह 'वाटा विकासाच्या' हा स्वच्छता अभियानावर आधारीत सिध्द ग्रंथ. **१९७८:-** लेखक सचिन वसंत पाटील यांचा जन्म. 'येरे येरे पैसा', 'सांगावा' इ. पुस्तके काशित. **१९८९:-** साहित्यिक अनुवादक विचारवंत भाकर वामन ऊर्ध्वरेषे यांचे निधन. यांच्या स्पूट लेखांचा संग्रह 'दिशा' या नावाने सिध्द तर माओत्से तुंग च्या पुस्तकाचा 'वाङ्:मय आणि कलेचा न', 'मॉक्झम गार्कीच्या मदरचा आई' तसेच 'लेनिनवादाचे न', 'रशियन लोककथा', 'युक्रेनियन लोक कथा' आदी अनुवादीत साहित्य सिध्द. 'हरवलेले दिवस'चा त्यांच्या आत्मकथनाला साहित्य अकादमी पुरस्कार लाभला. **१९९६:-** कथाकार व कादंबरी लेखक भाकर गोविंद अत्रे यांचे निधन. 'क्षण एक पुरेमाचा' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. 'शरीर', 'कथा एका राधेची', 'चिरंतनाचे आम्ही वासी', 'फासे', 'स्पर्श', 'मनस्वी' मिळून वीसहून अधिक कादंबऱ्या, तेवढेच कथासंग्रह तसेच 'कुसुमाग्रज', 'कथा सृजनाची' मधून साहित्यिकांच्या मुलाखती, 'वसा वादळाचा' हे सावरकरांवर लिहिलेले पुस्तक, अशी साहित्य संपदा.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० जुलै

१) श्री.मोहन कानू वर्तक, १०-०७-१९४९, अलिबाग
२) श्री.हरिश्चंद्र रामा बामजी १०-०७-१९४४, चेंढरे, अलिबाग
३)श्री.प्रवीण परशराम मोरे १०-०७-१९५२, अलिबाग
४)परमानंद नकछेद सिंह १०-०७-१९६१ तुडाल, अलिबाग

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**कै. निर्मला भास्कर पाटील**
**स्मरणार्थ, नवेनगर, कुरुळ, अलिबाग**

# पुनर्वसनाचा प्रश्न ३७ वर्षे प्रलंबित

## ● पावसाळी अधिवेशनात मुद्दा उपस्थित करण्यासाठी शिष्टमंडळाचे साकडे

**। रसायनी । वार्ताहर ।**

**जेएनपीटी बंदरासाठी रायगड जिल्ह्यातील नवीन शेवा हे गाव बोकरवीरा येथे स्थलांतरीत करण्यात आले होते. पण गेली ३७ वर्ष त्याच्या पुनर्वसनाचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. यासंबंधी माजी आमदार मनोहर भोईर यांच्या नेतृत्वाखाली ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष कमलाकर पाटील, उपाध्यक्ष एल जी म्हात्रे यांच्या शिष्टमंडळाने विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व आमदार सचिन अहिर यांची भेट घेऊन हा प्रश्न सुरु असलेल्या अधिवेशनात मांडण्यास विनंती केली.**



पुनर्वसित नवीन शेवा गावाचे पुनर्वसन १९८७ साली बोकडवीरा येथील सर्व्हे नं. ११२ मध्ये एकूण क्षेत्रफळ ३३.६४ हेक्टर जमिनीमध्ये झाले होते. मात्र, सिडकोकडून फक्त १० हेक्टरमध्ये नवीन शेवा गावाचे पुनर्वसन करण्यात आले. तसेच उर्वरित जागा सिडकोच्या ताब्यात असून ती जागा ग्रामस्थांना मिळावी म्हणून अनेकवेळा मोर्चा, आंदोलन, उपोषण केलेली आहेत. परंतु कित्येकवेळा ग्रामस्थांना आश्वासनाची खैरात देऊन पुनर्वसित नवीन शेवा ग्रामस्थांची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

नवीन शेवा ग्रामपंचायतीने अनेक वेळा जेएनपीटी, सिडको, जिल्हाधिकारी रायगड व तहसिलदार उरण यांच्याकडे वारंवार पत्रव्यवहार करूनही जागेचा ताबा मिळालेला नाही. माजी आमदार मनोहर भोईर यांनी विधानभवनामध्ये विनंती अर्ज समिती समोर हा विषय घेतला होता. त्याही वेळेस जमिनीचा ताबा देण्यात यावा, असे अध्यक्षांनी आदेश पारित केले होते. तरी सुध्दा सिडकोने त्या आदेशाचे पालन न करता केराची टोपली दाखविली होती. यामुळे नवीन शेवा गावातील ग्रामस्थांच्या भावना अतिशय तीव्र होत चालल्या आहेत आणि म्हणूनच आज नवीन शेवा गावच्या शिष्टमंडळाने विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व आमदार सचिन अहिर यांची भेट घेऊन हा प्रलंबित प्रश्न पावसाळी अधिवेशनात उचलावा अशी विनंती केली. यावेळी मुंबई मराठी पत्रकार संघात पत्रकार परिषद सुद्धा घेण्यात आली.

यावेळी नवीन शेवा गावच्या सरपंच सोनल घरत, उपसरपंच रेखा म्हात्रे, ग्राम पंचायत सदस्य प्रणीता भोईर, वैशाली म्हात्रे, पंडित घरत, भगवान घरत शिवसेनेचे निलेश घरत, अशोक म्हात्रे, निलेश घरत, अमित भोईर, सागर घरत, शेकापचे महेश म्हात्रे, काँग्रेसचे श्रेयश घरत, मनसेचे हेमंत म्हात्रे, राष्ट्रवादीचे देवराम घरत व सर्व पक्षातील कार्यकर्ते उपस्थित होते.



## सोसायटीची सरंक्षक भिंत पडली

**। पनवेल । वार्ताहर ।**

मुसळधार पावसाचा फटका अनेकांना बसला. त्यातच पनवेल तालुक्यातील कोप्रोली येथील अरिहंत अरहम सोसायटीच्या पाठीमागील बाजूस असलेल्या कंपाउंडची भिंत कोसळली. त्यामुळे येथील रहिवासी भयभीत झाले आहेत. पावसामुळे सगळीकडे दाणादाण उडाली होती. नद्या नाल्यांना पूर आले होते. अनेकांच्या घरांमध्ये पाणी शिरले. कोप्रोली येथील अरिहंत अरहम सोसायटीच्या पाठीमागून नदीच्या बाजूला असलेले कंपाऊंड भिंत रविवारी सकाळच्या सुमारास कोसळली. सकाळी मोठा आवाज झाल्याने रहिवासी त्या ठिकाणी पाहायला गेल्याने गर्दी झाली होती.

# डॉ.मो.स.गोसावी प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रम

**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**

येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी थोर शिक्षण तज्ञ, संस्थेचे माजी महासंचालक व सचिव. सर, डॉ. मो. स. गोसावी यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्त प्राचार्य, डॉ. श्रीनिवास जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य, व राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख किशोर लहारे यांचे हस्ते सर्व प्रथम प्रतिमा पूजन व पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. तसेच प्रा. लहारे यांनी डॉ. गोसावी सरांचे सखोल चरित्र कथन केले. या कार्यक्रम प्रसंगी त्यांच्या जीवन कार्य व शैक्षणिक योगदाना विषयी एक चित्रफित दाखविण्यात आली.



या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, एनएसएस स्वयंसेवक, प्राध्यापक, न्यु मॉडर्न स्कूल, आराठीचे सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सुत्र संचालन एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. नवज्योत जावळेकर यांनी केले, तर आभार प्रा. दिपाली पाठराबे यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ. निलेश चव्हाण, डॉ. कल्याणी नाझरे, प्रा. पंकज गमे शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली सावंत आणी शिक्षकेतर कर्मचारीवर्ग उपस्थित होते. गोखले शिक्षण संस्थेच्या सचिव, डॉ. दिप्ती देशपांडे व स्थानिक व्यवस्थापन समितीकडून या कार्यक्रमाचे कौतुक करण्यात आले.

## इलेक्ट्रीक डक्टमध्ये आग लागली

**। पनवेल । वार्ताहर ।**

आज सकाळी पनवेलजवळील मोठा खांदा येथे हनुमान मंदिराजवळ, गणेश टॉवरमध्ये इलेक्ट्रिक डक्टमध्ये अचानक लागली होती.

या आगीची माहिती पनवेल महानगर पालिकेच्या अग्नीशमन दलाला मिळताच तेथील अधिकारी हरिदास सूर्यवंशी, यंत्र चालक संदेश ठाकूर, अग्नीशामक ओमकार मोकल, विशाल राऊत, सागर कोळी, स्वप्निल ठाकूर इतर तसेच कळंबोली अग्निशमन कर्मचाऱ्यांच्या मदतीने सदर आग विझवण्यात आली. व रहिवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आल

# अग्नीशमन दलाच्या शर्थीच्या प्रयत्नामुळे जीव वाचला

**। पनवेल । वार्ताहर ।**

कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेकांना घराबाहेर पडता आले नाही. वलप गावाजवळील तळोजा कासाडी नदीला देखील महापूर आला होता. या ठिकाणी कामासाठी जात असलेले रामचंद्र गायकवाड हे तब्बल दोन तास झाडावर अडकून बसले होते. अग्निशामक दलाच्या जवानांनी त्यांना अथक प्रयत्नानंतर खाली उतरवले.

बरसत असलेल्या धो धो पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. गाढी नदी, कासाडी नदी व सर्वच नद्या दुधडी भरून वाहत होत्या. काही गावांमध्ये घरात पाणी शिरले तर काही सोसायट्यांमध्ये देखील पाणी गेले.

अनेक वाहने पाण्याखाली गेली. काही गावांमध्ये जाण्यासाठी रस्त्यात गुडघाभर पाणी होते. वलप-कानपोली जवळील कासाडी नदीला पूर आला होता. यावेळी मूळचे उरण येथील आणि कानपोली येथील बालाजी कॉम्प्लेक्समध्ये राहणारे रामचंद्र गायकवाड हे ड्युटीवरून येत होते.

यावेळी ते या पाण्याचा प्रवाहात अडकून राहिले. त्यामुळे ते थेट झाडावर चढले. पाण्याचा प्रवाह जास्त होता. याची माहिती अग्निशामक दलाला देण्यात आल्यानंतर अग्निशामक दलाची गाडी देखील पाण्याच्या प्रवाहात पुढे येत नव्हती.

त्यामुळे गाडी इथेच थांबवण्यात आली. त्यानंतर तळोजा अग्निशामक दल, सिडको अग्निशामक दल यांनी अथक प्रयत्न करून रामचंद्र गायकवाड यांची बांबू आणि रस्सीच्या सहाय्याने सुटका केली.



## घरांमध्ये घुसले पाणी



**। पनवेल । वार्ताहर ।**

कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे भोकरपाडा गावात जाण्या-येण्यासाठी असलेल्या रस्त्यावर गुडघाभर पाणी साचले होते. त्यामुळे गावात नागरिकांना त्रास सहन करावा लागला. धो-धो कोसळत असलेल्या पावसामुळे येथील स्वप्ननगरी चाळीतील जवळपास ३५ ते ४० घरांमध्ये पाणी शिरले होते. त्यामुळे अनेकांचे नुकसान झाले. त्यामुळे घरातील वस्तूंचे नुकसान झाले. गेल्या दोन दिवस पडलेल्या पावासामुळे जनजीवन पुरते विस्कळीत झाले होते. सर्वत्र पाणी साचल्याने नागरिकांचे चांगलेच हाल झाले.

नागरिकांच्या झालेल्या नुकसानीचा पंचनामा तलाठी यांनी केला आहे. त्यावेळी ग्रामस्थांनी मदत करत नागरिकांना धीर दिला.

# विद्यार्थ्यांचा अनोखा गेट टुगेदर



## वृषारोपण करुन झाडे जगवण्याचा संकल्प

**। वावोशी । वार्ताहर ।**

आपण या निसर्गाचं काहीतरी देणं आहोत हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून वावोशी येथील श्री छत्रपती विद्यालय व ज्युनिअर कॉलेजच्या सन २००५ च्या इयत्ता दहावीच्या बॅचमधील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला. जवळपास ६० ते ८० रोपे या ग्रुपच्यामार्फत लावण्यात आली, तसेच या ग्रुपने नुसती झाडे लावायचे नाही तर ते आपल्याला जगवायची सुद्धा आहेत हा उद्देश डोळ्यासमोर ठेवला आहे.

गेट-टुगेदर सर्व ग्रुप करतात पण आपण काहीतरी वेगळं केलं पाहिजे या उद्देशानेच हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. या ग्रुपने छत्तीशी विभागातील आपटी ग्रामपंचायत हद्दीतील शेडाशी येथील वनविभागाच्या जागेमध्ये वृक्षारोपण केले.

माजी विद्यार्थ्यांनी समाजाला एक चांगला संदेश दिला आहे. त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

## नव्या कंपनीत भूमिपुत्रांना रोजगाराची हमी

**। रसायनी । वार्ताहर ।**

सारंग येथे एका खासगी कंपनीने जमीन खरेदी केली असून लवकरच व्यवसाय उभारणी होणार आहे. या व्यवसायाच्या माध्यमातून अनेक कुटुंबाचा उदरनिर्वाह चालणार आहे. यासाठी नव्वद टक्के शेतकऱ्यांनी पाठींबा दिला आहे, असे मत घनशाम गरुडे यांनी व्यक्त केले. नुकतीच संघर्ष समितीच्या माध्यमातून सारंग येथील शेतकऱ्यांनी संबंधित कंपनी व्यवस्थापकांची भेट घेतली आणि ग्रामस्थांच्यावतीने सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

खालापूर तालुक्यात मोठी औद्योगिक वसाहत असली तरी या औद्योगिक वसाहतीमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार मिळविण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. दुसरीकडे सारंग येथे नव्याने सुरू होत असलेल्या मे. क्लेरीझेस एस.इ.झेड. प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने स्थानिकांना रोजगार देणार आहे.

# सीड बॉलच्या माध्यमातून जंगलात वृक्षारोपण



**। खालापूर । वार्ताहर ।**

सहजसेवा फाऊंडेशनच्या ७ व्या वर्धापन दिनी ७ जुलै २०२४ रोजी सीड बॉलच्या माध्यमातून चिंचवली गोहे वनक्षेत्रात वृक्षारोपण करण्यात आले. नजीकच्या वनक्षेत्रात बियाण्यांच्या माध्यमातून नकळत रोपांची वाढ होण्यासाठी उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी झुडपात असंख्य सीड बॉल टाकण्यात आले.

समाजासोबत आपण निसर्गाचे देणे लागतो. या भावनेने दरवर्षी प्रमाणे सीड बॉल हा उपक्रम संस्था राबवते. चिंचवली गोहे पोलीस पाटील दिनेश पाटील, सरपंच प्रकाश पाटील, श्रीराम पाटील, प्रविण पाटील, रमेश पाटील, एकनाथ पाटील, बळीराम पाटील, दिगंबर पाटील, संदिप पाटील, दिनेश पाटील, रामचंद्र पाटील तसेच प्राथमिक शाळेतील मुले करूणा पाटील, मयूर जैन, पार्थ यादव, प्रकाश तोंडे, राजेंद्र ढोरे, दमयंती कोळी, शोभा माने यांच्या सहकार्याने विस्तीर्ण वनक्षेत्र असलेल्या भागात सीड बॉल टाकण्यात आले.

समाजातील नामवंत व्यक्तींनी या उपक्रमात सहभाग घेतला तसेच चिंचवली गोहे येथील बाळ गोपाळांनी देखील आगळ्या वेगळ्या उपक्रमात मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.

## रोटरी पनवेल अध्यक्षपदी शैलेश पोटे

**पनवेल :** रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचा वर्ष २०२४-२५ अध्यक्ष पदग्रहणाचा सोहळा अतिशय दिमाखात संपन्न झाला. पनवेलमधील प्रथितयश मसाल्याचे उद्योजक रोटेरियन शैलेश पोटे यांनी अध्यक्ष पदाची धुरा खांद्यावर घेतली. या कार्यक्रमासाठी डिस्ट्रीक्ट ३१३१ चे डिस्ट्रीक्ट गव्हर्नर नॉमिनी रो. नितीन ढमाले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच प्रसिद्ध उद्योजक रो. काशिनाथ पोटे आणि पनवेलचे प्रसिद्ध सर्जन डॉ. गिरीश गुणे हे गेस्ट ऑफ ऑनर म्हणून उपस्थितीत होते. तसेच असिस्टंट गव्हर्नर डॉ. किरण कल्याणकर, पनवेलचे माजी सभागृह नेते रोटेरियन परेश ठाकूर, माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे देखील उपस्थित होते.

# मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योनेंतर्गत मुरुडमध्ये शिबीर

**। आगरदांडा । वार्ताहर ।**

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटूंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मुरूड जंजिरा नगरपरिषद हद्दीतील या योजनेसाठी पात्र असलेल्या लाभार्थ्यांना अर्ज करणे सुलभ व्हावे, या उद्देशाने मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात तीन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



## ५२५ महिलांचे अर्ज दाखल

महिलांना त्रास होऊ नये त्या करिता नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार यांनी वार्ड क्रमांक वाईज १० टेबल लाव ले होते. त्यानुसार अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. शहरातील महिलांनी याला चांगला प्रतिसाद दिला. या तीन दिवसीय शिबिरात ५२५ महिलांनी सहभाग नोंदवुन आपला ऑफलाईन अर्ज भरला.

या मोहिमेकरिता संजय वेटकोळी, सचिन कोकरे, सुदेश माळी, श्वेता विरकुड, मयुर चौलकर, पल्लवी डोंगरीकर, प्रणाली शिंदे, प्रेरणा चौलकर, सतेज निमकर, मीनाक्षी गुंजाळ, जयेश चोडणेकर, आरती शेडगे, नम्रता करडे, प्रिती सैंदाणे, मनोज पुलेकर, अविनाश अवघडे, राकेश राखडे, अविनाश ठाकूर, सचिन कोरके, भरत शिंदे, संजय वेटकोळी, प्रज्वल गुरव, शशिकांत किंबहुने, निलेश शेडगे, उत्कर्षा रणदिवे, पल्लवी रेवडे, प्रशांत दिवेकर, मितेश माळी, सायली गुंजाळ, संध्या नागे, संजना म्हात्रे, महेंद्र हावरे आदिंसह कर्मचाऱ्यांनी ऑफलाईन व ऑनलाईन अर्ज भरण्याचे काम पाहिले.

# महानगरपालिकेच्यावतीने आपत्कालीन कार्य सुरू

**। पनवेल । वार्ताहर ।**

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिनांक ०६ जुलै रोजी रात्री २ वाजल्यापासून मुसळधार पाऊस पडत होता. ७ जुलै रोजी सकाळी ७ वाजेपर्यंत सुमारे १२१ मिमि पाऊस महापालिका कार्यक्षेत्रात झाला आहे. पनवेल महानगरपालिकेमार्फत आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या माध्यमातून पूरग्रस्तांसाठी मदत कार्य सुरू करण्यात आले आहे. या कक्षामार्फत एकुण १२०० मनुष्यबळ उपलब्ध करण्यात आले आहे.**



आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार आपत्कालीन पुरस्थिती नियंत्रित करण्याकरीता आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्यावतीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व प्रभागामध्ये पाणी साचलेल्या ठिकाणी पाण्याचा निचरा होण्यासाठी पंपिंग मशीन बसविण्यात आले असून साचलेल्या पाण्याचा निचरा योग्य प्रकारे करण्यात येत आहे.

महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-क पनवेल कार्यक्षेत्रातील पटेल मोहल्ला येथील ७० पुरग्रस्त नागरीकांना उर्दू शाळेत स्थलांतरीत करण्यात आले आहे. पनवेल कोळीवाडा येथील ९० पुरग्रस्त नागरीकांना कोळीवाडा शाळेत स्थलांतरीत करण्यात आले आहे. सदर पुरग्रस्त नागरीकांना चहा पाणी व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ब कार्यक्षेत्रातील रोडपाली आदिवासी वाडीतील ६० घरे पाण्याखाली गेली असून सदर २५० पुरग्रस्त नागरीकांना रोडपाली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे. सदर पुरग्रस्त नागरीकांना देखील चहा-पाणी व जेवणाची व्यवस्था करण्यात आली. कळंबोली प्रभागामध्ये पाण्याचा निचरा होणेसाठी एकुण २७ ठिकाणी पंप सुरू असून त्यामार्फत पाण्याचा निचरा करण्यात येत आहे. सदर ठिकाणी पनवेल महानगरपलिकेमार्फत ४५० कर्मचारी काम करीत आहेत.

दरम्यान, पडघे गावातील मुख्य प्रवाहाच्या नाल्यातील पावसाचा प्रवाह कमी झालेला आहे. खारघर प्रभागामध्ये पाण्याचा निचरा होणेसाठी एकुण १४ पंप सुरु असून त्यामार्फत पाण्याचा निचरा करण्यात येत आहे. सदर ठिकाणी पनवेल महानगरपलिकेमार्फत कर्मचारी काम करीत आहेत. खारघर प्रभागामधील उपविभाग नावडे विभागात पाण्याचा निचरा होणेसाठी एकुण ०५ पंप सुरु असून एका ठिकाणी जेसीबीमार्फत पाण्याचा निचरा करण्यात येत आहे. धुर फवारणी,व जंतुनाशक पावडर फवारण्यात येत आहे.

# डॉक्टर सेल उपाध्यक्ष पदी डॉ. आशिष बांदेकर

**। पनवेल । वार्ताहर ।**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रणित डॉक्टर सेल उपाध्यक्ष पदी पनवेलचे डॉक्टर आशिष बांदेकर यांची नियुक्ती करण्यात आली. आमदार अनिल परब यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी आमदार परब यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉक्टर आशिष बांदेकर यांनी शुभेच्छा दिल्या.



डॉक्टर आशिष बांदेकर सुकापुर येथे शिवसेनेचे काम करत आहेत. त्यांच्या कामाची दाखल घेत डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉक्टर विवेकानंद जाजू आणि डॉक्टर कमिटीकडून संधी मिळाली आहे. डॉक्टर आशिष बांदेकर यांनी नियुक्ती नंतर शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख शिरीष घरत यांची भेट घेऊन शुभेच्छा घेतल्या. यावेळी रायगड जिल्हा प्रमुख शिरीष घरत, जिल्हा समन्वयक अनिल चव्हाण, उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, विधानसभा संपर्क प्रमुख वैभव सावंत, विधानसभा संघटक दिपक निकम, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर बडे, उपविभाग प्रमुख जयंत पाखरे, विभागप्रमुख विशाल भोईर, सुकापूर शाखा प्रमुख हनुमंत खंडागळे, देवद शाखा प्रमुख सुरेश माने, अनिल पाठक, भिकाजी चव्हाण, हितेंद्र सोलकर, बिपिन झुरे, सचिन खरात, सिदेश चव्हाण, मनोहर कदम आदी उपस्थित होते. त्यांनी बांदेकर यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

**निवडक**

## दीर्घ सेवा पुरस्कार वितरण

**उरण :** ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेडच्या वतीने दीर्घ सेवा पुरस्कार वितरण सोहळा नुकताच नवीमुंबई येथील फोर पॉईंट हॉटेल येथे उत्साहात संपन्न झाला. ग्राइंडवेल नॉर्टन कंपनीचे कार्यकारी संचालक वेणूशानबाग यांच्या हस्ते कंपनीमध्ये १५ वर्षे, २५ वर्षे व ३५ वर्षे सेवा दिली आहे, अशा कामगारांना सन्मान चिन्ह,सन्मान पत्र देवून गौरविण्यात आले. या प्रसंगी ग्राइंडवेल नॉर्टनचे हरीसिंगु दासू ,अमित कौंल, अन्वेशा सेन, इंद्रभान सिंग, अनंता कामथ, राहुल देशक, धनंजय म्हात्रे, गणेश पाटील, लक्ष्मण रेवणे, संदीप राऊत आदी उपस्थित होते.

## रिक्षा गेली वाहून

**पनवेल :** तळोजा औद्योगिक क्षेत्रातील पडघे गावात एक रिक्षा पावसाच्या पाण्यात वाहून गेल्याची घटना घडली आहे. सुदैवाने या रिक्षामध्ये कोणीही नव्हते. त्यामुळे कोणतीही जीवित हानी झाली नाही. रविवार ७ जुलै रोजी पहाटेपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. या पावसाने जनजीवन विस्कळीत झाले.गावातील ब्रिजवर उभी ठेवण्यात आलेली रिक्षा या पावसाच्या पाण्यामुळे वाहून गेली.तर मुसळधार पावसामुळे पनवेल तालुक्यातील मोरबे गावातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते.

## औषधी वनस्पती लागवड

**रसायनी :** इरशाल पुनर्वसन वाडीवर स्नेहल महिला मंडळाच्यावतीने वृक्ष लागवड करण्यात आली. नम्राची वाडी येथे पुनर्वसन काम प्रगती पथावर आहे.४२ कुटुंबाची गृह प्रकल्प योजना ज्या ठिकाणी सुरू आहे. त्यांच्या प्रांगणात औषधी वनस्पती,बेलाचे झाड,कडुनिंब व फळांच्या झाडांची लागवड चौक येथील स्नेहल महिला मंडळाच्या वतीने करण्यात आली.यावेळी महिला मंडळाच्या अनेक सदस्या उपस्थित होत्या. स्नेहल महिला मंडळामार्फत मदतीचा हात दिला आहे.

## सुरक्षेविषयक प्रबोधन

**उरण :** वाहतूक शाखेतर्फे जड चालकांना वाहतुकीच्या सुरक्षेबाबत प्रबोधनपर कार्यक्रम राबविण्यात आला.यावेळी वाहनचालकांनी अवजड वाहन चालविताना सीटबेल्टचा वापर आवश्यक करणे, मोबाईल वर संभाषण न करणे, मद्यप्राशन करून गाडी चालवू नये याबाबत प्रबोधन करण्यात आले. उरण वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक वैशाली गलांडे याच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलीस सुरक्षेबाबत प्रबोधन करीत असल्याची माहिती वाहतूक पोलिसांनी दिली आहे.

## दत्त मंदिर येथे वृक्षलागवड

**आगरदांडा :** मुरुड पद्मदुर्ग लीग तर्फे दरवर्षी क्रिकेटचे सामने आयोजित केले जातात. क्रिकेट बरोबरच आता पदमदुर्ग लीगमार्फत विविध सामाजिक व निसर्गाला आवश्यक असे उपक्रम राबवले जातात.यंदा त्यांच्यामार्फत मुरुड येथील दत्तमंदिर टेकडीवर विविध वृक्षांच्या रोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.पाऊस जास्त पाडण्यासाठी जे वृक्ष आवश्यक आहेत अशा वृक्षांची लागवड करण्यात आली.यावेळी मुरूड पद्मदुर्ग लीगमंडळातील सदस्य उपस्थित होते.

# तळ्यात आपत्ती निवारण कक्ष सज्ज

**। तळा । वार्ताहर ।**

**तळा तालुक्यासाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडा व नियोजनासह आपत्तीवर मात करण्यासाठी तळा आपत्ती व्यवस्थापन कक्ष सज्ज झाला आहे. तळा तालुक्यात २५ ग्राम पंचायती, ६९ महसुली गावे व १ नगरपंचायत असून तालुका हा डोंगरी व काही भाग खाडीलगत आहे.**

जूनपासून मान्सूनच्या पावसाला सुरूवात झाली असून पावसाळ्यात दरड कोसळणे अथवा खाडीकिनारी भागात, नदी किनारी भागात पूर येणे अथवा रस्ता खचणे, वाहून जाणे अशा अनेक समस्याना सामोरे जावे लागते, अशावेळी जास्त नुकसान होऊ नये यादृष्टीने तालुका स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यावेळी ज्या ज्या साधनांचा वापर करता येईल अशा साधनांचा वापर कसे करता येईल याचे प्रशिक्षण व माहिती दिली जाते. त्या दृष्टीने तळा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे.

तळा तालुक्यातील कडक्याची गाणी, बेलघर, जोगवाडी, पुसाटी, गिरणे रोवळा-खोडखोल अदिवासीवाडी, चरई बुद्रुक, वावे हवेली अशी एकुण ८ गावे संभाव्य दरडग्रस्थ म्हणून घोषीत करण्यात आली आहेत. तसेच पूर रेषेखालील गावांचा ही समावेश आराखड्यात करण्यात आला आहे. नुकतेच अधिकारी, पालक अधिकारी, खातेप्रमुख तलाठी, व पोलीस पाटील आदींना मार्गदर्शन केले आहे. धोकादायक इमारती, घरे, संभाव्य दरडग्रस्त गावे, पूर रेषेखालील गावे यांचा आढावा घेण्यात आला असून त्यासाठी आपत्ती काळात पर्यायी निवाऱ्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

दैनंदिन पर्यवेक्षण तलाठी, पोलीस पाटील व सर्व विभागांच्या



सभा घेवून त्यानुसार सूचना देण्यात आल्या आहेत. दरडग्रस्त गावांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. अत्यावश्यक महत्वपूर्ण सेवा देणाऱ्यांची यादी, प्रथमोपचार पेटी, डॉक्टर, पोलीस यंत्रणा, ग्रामस्तरीय शोध पथक व आपदामित्र, सजेनिहाय स्थानिक कार्यकर्ते व संपर्क यंत्रणा, संभाव्य दरडग्रस्त गावे, संभाव्य पूरग्रस्त गावे, शोधबचाव साहित्य, जेसीबी, ट्रकचालक मालक, पोहणाऱ्या व्यक्ती, सर्व कार्यालये व अधिकारी वर्ग, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, कोतवाल, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, आदींचे संपर्क व आपत्तीत करावयाची कामे याबाबत संभाव्य येणाऱ्या आपत्तीवर योग्य रितीने मात करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे.

तालुक्यात अतिवृष्टी होत असते. या सर्व गोष्टींचा विचार करून उपाययोजना व आराखडा तयार करून तळा तालुका आपत्ती निवारणासाठी सज्ज झाला आहे. तालुक्यात जुन-जुलै २००७ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत ६० गावे बाधीत होऊन २ बालकांचा मृत्यू झाला होता. तसेच ११ गुरांचा मृत्यू झाला होता. २००९ मधे अतिवृष्टीने २ गावे बाधीत होऊन २ गुरांचा मृत्यू झाला होता.

३ जून २०२० च्या निसर्ग चक्रीवादळाचा मोठा फटका तळा तालुक्याला बसला होता. त्यावेळी तालुका व्यवस्थापन समिती व कक्षाने चांगले काम केले होते. याचा तळ्यातील नागरिकांना आधार झाला होता. वेळीच सर्व सूचना नागरिकांना मिळाल्याने नागरिकांना सावध राहता आले होते. तालुक्याची भौगोलिक परिस्थिती व पडणारा पाऊस तसेच कोणत्या भागात कोणत्या अडचणी किंवा आपत्ती येऊ शकते. याचा विचार करून तळा तालुक्याचा आपत्ती निवारण आराखडा व उपाययोजनांबाबत नियोजन करण्यात आले आहे.



# आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। नागोठणे । वार्ताहर ।**

मुलं ही देवाघरची फुलं या संकल्पनेतून नागोठणे मित्र परिवार यांच्या वतीने गेली १० वर्षे नागोठणे परिसरातील दुर्गम भागातील शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले जात आहे. याचाच एक भाग म्हणून रोहा तालुक्यातील नागोठण्याजवळील राजिप शाळा चेराठी आणि काळकाई या दुर्गम अशा शाळांतील आदिवासी ठाकूर समाजाच्या विद्यार्थ्यांना नागोठणे मित्र परिवार यांच्या वतीने विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले वह्या, पेन व पेन्सिल या शैक्षणिक साहित्यांचे व खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी नागोठणे मित्र परिवार ग्रुपचे ज्येष्ठ सदस्य सेवानिवृत्त मुख्याध्यापक उल्हास नागोठकर, पालीवाला महाविद्यालयाचे वाणिज्य विभागाचे प्राध्यापक संतोष भोईर, ईजी वे स्पोकन इंग्लिश क्लासेस नागोठणेचे संचालक दिनेश खंडागळे, नाडसूर हायस्कूलचे प्रभारी मुख्याध्यापक संदीप दरेकर, नागोठणे येथील भाजी व्यापारी शैलेश मांडवकर, वैष्णवी झेरॉक्सचे मालक सुधीर नागोठकर, नागोठणे परिसरातील प्रसिद्ध मृदुंगमणी संजय तळेकर, वासगाव गावचे शिक्षक खेळू हंबीर,आबा कुंभार आदी उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांनी घेतला भातलावणीचा आनंद

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम राबवीत असून त्याचाच एक भाग म्हणून शालेय जीवनात विद्यार्थ्यांना कामाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने अनेक सहशालेय उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आंबवडे सैनिक विकास मंडळ संचलित स्वर्गीय शांताराम शंकर जाधव न्यू इंग्लिश स्कूल पळचिल विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहशालेय उपक्रमांतर्गत दप्तराविना शाळा अनुभवताना शनिवारी विद्यार्थी व शिक्षकांनीही भात लावणीचा आनंद लुटला.

शेतातील आवन कसे काढावे, नांगरणी कशा पध्दतीने केली जाते, शेती मशागतीची पध्दत, भात लावण्यासाठी पावसाच्या पडणारे पाणी शेतात किती प्रमाणात आवश्यकअसते, भातलावण्यासाठी किती प्रमाणात चिखल केला जातो आधुनिक पध्दतीने शेती कशी केली जाते याविषयी विद्यालयाचे शिक्षक प्रल्हाद चिविलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही भात लावणीचा आनंद घेतला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय जैतपाल, शिक्षक प्रल्हाद चिविलकर, महिपत कोकरे, ज्योती गीते आदी शिक्षकांनी ही विद्यार्थ्यांसमवेत सहभागी होऊन भात लावणीच्या उपक्रमात सहभाग घेतला. शासनाच्या या सहशालेय उपक्रमात विद्यार्थ्यांना कामाची आवड निर्माण व्हावी, यासाठी शासन शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना विविध उपक्रमात सहभागी करून शिक्षकांमार्फत विविध योजना आणि उपक्रम राबवत आहे.

# तुपगावात महिलांसाठी दोन दिवसीय शिबीर

**। रसायनी । वार्ताहर ।**

चौक तुपगाव येथे मुख्यमंत्री लाडकी बहिण या योजनेचा महिलांना लाभ मिळावा,यासाठी दोन दिवसीय शिबिराचे आयोजन संत गोरोबाकाका मंदिरामध्ये करण्यात आले.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, मुलींना स्वावलंबी, आत्मनिर्भर करण्यासाठी व आर्थिक दुर्बल घटकातील महिलांच्या बँक खात्यात प्रति महिना १५०० रुपये जमा होणार आहेत. गावातील सर्व महिलांना या योजनेचा लाभ मिळावा. याकरीता महिला वर्गासाठी मोफत फॉर्म उपलब्ध करून दिले. योजनेपासून कोणीही वंचित राहू नये. कागदपत्रासाठी धावपळ करायला लागू नये. फॉर्ममध्ये त्रुटी राहू नये परिपूर्ण फॉर्म भरला पाहिजे या दृष्टिकोनातून सर्व महिलांचे फॉर्म भरून घेतले त्यांचे कागदपत्राची तपासणी केली. शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत योजना शिबिराच्या माध्यमातून पोहोचवल्या जातात सरकारी यंत्रणांवरदेखील अशा या शिबिरांमुळे ताण येत नाही. कामाचा ताण कमी होत असतो. या दोन दिवसीय शिबिरामध्ये महिला वर्गाने मोठ्या संख्येने सहभागी होऊन २५० फॉर्म शिबिराच्या माध्यमातून भरून घेण्यात आले आहे. या योजनेचा कालावधी १ जुलै २०२४ पासून ते ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत नोंदणी सुरू राहणार असल्याचे सरपंच रविंद्र कुंभार यांनी सांगितले.

## जीवक जाधवचे परीक्षेत यश

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर प्रवेश परीक्षेत नवघर शाळेचा विद्यार्थी जीवक आनंद जाधव याने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये उज्ज्वल यश प्राप्त केले. नवोदय विद्यालय निजामपूर येथे इयत्ता ६ वी च्या वर्गात प्रवेश घेण्यासाठी त्याची मेरिटच्या आधारे निवड झालेली आहे. जीवक ने हे यश प्राप्त केल्याबद्दल सर्वच स्तरातून त्याचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.नवोदय विद्यालयात निवड होऊन शाळेचा नावलौकिक वाढवल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक अनिल राणे, शिक्षक वृंद व शाळा व्यवस्थापन समितीने जीवक याचे अभिनंदन केले व त्याला पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# तळई येथे वृक्षारोपण

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या वतीने पद्मश्री डॉ अप्पासाहेब धर्माधिकारी व रायगड भूषण सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ नानासाहेब धर्माधिकारी यांच्या स्मृती दिनानिमित्त सुधागड तालुक्यातील पाली तळई येथे श्री सदस्यांनी वृक्षारोपण केले.

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने स्वच्छता अभियान, रक्तदान शिबीर, वृक्ष लागवड इत्यादी लोकोपयोगी विविध उपक्रम राबविले जातात. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड करणे ही काळाची गरज आहे. ही गरज ओळखून दरवर्षी श्री सदस्य मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करतात आणि ते वृक्ष मोठे होईपर्यंत आवडीने त्या वृक्षांचे संवर्धन देखील करतात.त्याचप्रमाणे यावर्षी देखील श्री बैठक पाली येथील श्री सदस्यांनी सकाळी ८ वाजता तळई येथे वृक्ष लागवड करण्यास सुरुवात केली.



# कळंब सुतारपाडा येथील कुटुंब घरकुलाच्या प्रतीक्षेत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कळंब ग्रामपंचायतीमधील सुतारपाडा या गावातील कातकरी वाडीमधील आदिवासी लोक आजही कुडामेडीच्या घरात राहत आहेत.वरची वाडी म्हणून परिचित असलेल्या वाडीमधील त्या कुटुंबांचा मागील तीन वर्षापासून घरकुल मिळावे म्हणून लढा सुरु असून ग्रामपंचायत या आदिवासी कुटुंबांना घरकुल देण्यात अयशस्वी ठरली आहे. दरम्यान त्या कुटुंबाला शासन घरकुल देणार आहे किंवा नाही असा सवाल सामाजिक कार्यकर्ते दीपक बोराडे यांनी उपस्थित केला आहे.

गीता पारधी या आपल्या मुलांसह वाडीमध्ये राहतात. या कुटुंबाने मागील १५ वर्षे सातत्याने घरकुल मिळावे म्हणून सरकारी कार्यालयाचे उंबरठे झिजवले आहेत. या कुटुंबाच्या घराच्या आसपास सरपटणारे प्राणी यांचा वावर असतो आणि त्यांचा धोकादेखील या कुटुंबाला सतत असतो.त्यामुळे अशा कुटुंबाला घरकुल द्यावे यासाठी सामाजिक कार्यकर्ते दीपक बोराडे यांनी सरकारी दरबारी पाठपुरावा करण्यासाठी सुरुवात केली आहे.

# पोयनाड येथे 'माझी लाडकी बहीण' योजनेसाठी शिबीर

**। पोयनाड । प्रतिनिधी ।**

पोयनाड येथे जिल्हाधिकारी कार्यालय रायगड व तहसील कार्यालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने पोयनाड मंडळअधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत लाभार्थींसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

उपस्थित सर्व लाभार्थी यांचे अर्ज भरून घेणे व कागदपत्रांची पूर्तता करणे याकरिता मंडळ अधिकारी पोयनाड महेश निकम व मंडळ अधिकारी चरी सूर्यकांत विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली पोयनाड मंडळ अधिकारी कार्यालयातील विविध सजांचे सर्व तलाठी, ग्रामसेवक, केंद्रचालक, कोतवाल, अंगणवाडी सेविका व विभागातील बचतगटाच्या महिलांनी लाभार्थींना फॉर्म भरण्यासाठी सहकार्य केले. ताडवागळे येथील प्रीमियम कंपनीचे व्यवस्थापक दर्शन म्हात्रे यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी व लाभार्थींसाठी मोफत अल्पोपहाराची व्यवस्था केली.

प्रत्येक मंडळ कार्यालयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या लाभार्थींसाठी शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे, यासाठी रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे, उपविभागीय अधिकारी अलिबाग मुकेश चव्हाण व अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील हे शिबिराचे आयोजक म्हणून मार्गदर्शन करीत आहेत.

## प्रियांश घरत तालुक्यात प्रथम

**पेण :** इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत प्रियांश चंद्रकांत घरत यांनी चमकदार कामगिरी करत ग्रामीण विभागात तालुक्यातून प्रथम येण्याचा मान मिळवला. या अगोदर घेण्यात आलेल्या नवोदय विद्यालय परीक्षेत उत्तम कामगिरी करत ग्रामीण भागामधून प्रियांशची निवड झाली आहे. नेहमीच सर्व स्पर्धा परीक्षेत उत्तम कामगिरी करुन गावाचे व शाळेचे नाव उज्वल करीत आहे. यासाठी शाळा व विद्यार्थी यांचे करिता सतत प्रयत्नशील असणारे शाळेचे मुख्याध्यापक प्रविण पाटील, मार्गदर्शक दिनकर पाटील व शिक्षक वृंदाकडून कौतुक होत आहे.

# शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**। माथेरान । वार्ताहर ।**



स्व.मीनाक्षी तमीळ आमुधन यांच्या स्मरणार्थ नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळेत येथील गव्हाणकर एज्युकेशन ट्रस्ट, सेंट झेव्हियर स्कुल आणि वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेतील सर्व शालेय विद्यार्थ्यांना मिशन माथेरान सोशल ग्रुपच्या सौजन्याने शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तर काही गरजवंत स्टॉल्स धारकांना स्टेंल छत्र्या देण्यात आल्या.

मुंबईचे रहिवासी आमुधन हे नेहमीच इथल्या गरजवंताला मदतीचा हात देत असून अत्यावश्यक साहित्य वाटप करीत असतात. त्यांच्या या महत्वपूर्ण कार्यात त्यांना मिशन माथेरान सोशल ग्रुपचे सहकार्य लाभत असते. याप्रसंगी भाजप अध्यक्ष प्रवीण सकपाळ,क्षत्रिय मराठा समाज अध्यक्ष चंद्रकांत जाधव, माजी नगरसेवक प्रदीप घावरे, राजेश चौधरी,संदीप कदम, किरण चौधरी, राकेश चौधरी, शैलेश चाफेकर यांनी या कार्यक्रमासाठी विशेष मेहनत घेतली. तर हरिहरपुत्र भजन समाज, लायन्स क्लब, रोटरी क्लब मुंबई, गिफ्ट अस्माईल चेंबूर यांचे या कार्यक्रमात महत्वपूर्ण योगदान लाभले.

यावेळी माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, प्रकाश सुतार, सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे, नितीन शहा, गव्हाणकर शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पाटील, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दिलीप अहिरे, शिक्षक वृंद तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- मांडवा येथे गाडीवर ड्रायव्हर पाहिजे आहे. मो. ८००७८९३२३२/९४२१९५४३४८ पगार १५ ते १८ हजार
- अलिबाग मधिल ऑफिस करिता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन,आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- Tally अकाऊंट कामाचा अनुभव असलेली लेडीज हवी आहे. ८००७८३३२३२ झिराड, पगार १८०००/२१०००

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## कृषी विभागाचा पुढाकार

# रायगडात परसबाग फुलणार

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**कोकणात परसबागेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दररोजच्या जेवणासाठी आवश्यक भाजीपाला अनेकजण घराच्या बाजूलाच असलेल्या परसबागेत लावतात. अगदी कडीपत्त्यापासून नारळाच्या झाडापर्यंत परसबागेत लागवड केली जाते. परसबागेतील या लागवडीला आता कृषी विभागाकडूनही प्रोत्साहन मिळत आहे.**

दुर्गम भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने यंदाच्या खरीप हंगामाकरिता बियाणांच्या २४ हजार पाकिटांचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले शिवाय परसबागेत भाजीपाला लागवडीचे प्रात्यक्षिके दाखवून त्यांना योजनेत सामावून घेण्यात येत आहे.

विशेषतः कुपोषणाचे प्रमाण जास्त असलेल्या कर्जत, खालापूर, पेण या आदिवासी बहुल तालुक्यांमध्ये पौष्टिक आहार पुरविण्यासाठी घराभोवती असलेल्या परसबागेत आता भाजीपाला लागवडीस प्रोत्साहन दिले जात आहे. यासाठी टोमॅटोच्या पुसा, रुबी वाणाची निवड करण्यात आली आहे, तर भेंडीच्या अर्का, अनामिका, मिरचीचे ज्वाला वाण, चवळीचे पार्वती वाणाचे २५ ग्रॅम वजनाचे पाकिट निवड झालेल्या शेतकऱ्यांना देण्यात आले आहे.

कुपोषण मुक्तीसाठी जिल्हा परिषदेकडून शेगवा लागवडीची योजना तीन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आली. शेगवा लागवड योजनेस चांगला प्रतिसाद मिळाल्याने आता परसबाग योजनेतून कुपोषण कमी करण्याचा प्रयत्न आहे.

आदिवासी कुटुंबांच्या घराभोवती असलेल्या परसरबागेत पौष्टिक भाजीपाला व फळांची लागवड केल्यास आदिवासींना सकस आहार मिळू शकतो. त्यामुळे या भाजीपाला व फळांची लागवड करण्यासाठी आदिवासींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने मागील काही वर्षांपासून रायगड जिल्ह्यात ही योजना राबवण्यात



येत होती. आदिवासींच्या आहारात जीवनसत्त्व व इतर आवश्यक पोषक द्रव्ये समाविष्ट करण्याच्या उद्देशाने ही पौष्टिक आहार योजना सरकारने अमलात आणली आहे. मात्र, तिची व्यापकता वाढवण्यात आलेली नव्हती.

> परसबागेतील भाजीपाला लागवडीने सकस आहार घरच्या घरी पिकवता येते. कोकणात ही पद्धत फार पूर्वीपासून आहे, परंतु काही तालुक्यांमध्ये ती विकसित होणे गरजेचे आहे. यासाठी टोमॅटो, भेंडी, मिरची, चवळीच्या २५ ग्रॅम बियाण्यांचे पाकिटे देण्यात येत आहेत, अशी २४ हजार पाकिटांचे संच वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे.
>
> – सतीष बोराडे, प्रकल्प संचालक, आत्मा.

# पालिकेकडून खड्ड्यांची डागडुजी

**। माथेरान । वार्ताहर ।**

**शहराच्या मुख्य प्रवेशद्वारापासून नव्याने बसविण्यात आलेल्या क्ले-पेव्हर ब्लॉकच्या महात्मा गांधी रस्त्याला जागोजागी खड्डे पडले होते. यामुळे पादचाऱ्यांना येथे रस्त्यावरून चालताना तारेवरची कसरत करावी लागत होती. आता पावसाने थोडी उसंत घेतल्यामुळे पालिकेकडून महात्मा गांधी रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम सुरू झाले आहे.**



माथेरानमधील महात्मा गांधी मुख्य रस्त्यावर एमएमआरडीएच्या माध्यमातून येथे क्ले-पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले होते. पावसाळ्यात येथील मातीची धूप थांबावी याकरिता हे ब्लॉक लावण्यात आले होते. मात्र, काही ठिकाणी अपरिपक्व, निकृष्ट क्ले-पेव्हर ब्लॉक बसविण्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात आला. त्यामुळे मागील पावसातच या ब्लॉकची झीज होऊन त्याठिकाणी खड्डे पडले होते. त्यामुळे या मुख्य महात्मा गांधी रस्त्यावरून चालताना नागरिकांना, पर्यटकांना, शालेय विद्यार्थ्यांना तसेच ज्येष्ठ नागरिक व आबालवृद्धांना तारेवरची कसरत करावी लागत होती. त्याचबरोबर येथील घोडे आणि ई-रिक्षालादेखील रस्त्यावरून जाताना या खड्ड्यांमुळे नाहक त्रास सहन करावा लागत होता.

याबाबत माथेरानमधील अनेक नागरिकांनी सेवाभावी संस्थांनी पालिकेला वेळोवेळी निवेदन दिले होते. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून नगरपालिका प्रशासनाने पावसाने थोडी उसंत घेताच महात्मा गांधी रस्त्यावरील खड्डे भरण्यास सुरुवात केली आहे. दगड गोटे व माती भरून तूर्तास हे खड्डे बुजविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

# विनयभंगप्रकरणी आरोपीस सक्तमजुरी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी आरोपीस पाच वर्ष सक्तमजुरीची शिक्षेचा महत्त्वपूर्ण निर्णय माणगाव सत्र न्यायाधीशांनी दिला आहे. ही घटना कोलाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील डोलवहाळ गावाच्या हद्दीत गावदेवी मंदिराजवळ दि. ८ जानेवारी २०२१ रोजी घडली होती.

या घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, पीडित अल्पवयीन मुलगी व आरोपी हे एकाच गावातील राहणारे असून, पीडित मुलगी तिच्या मैत्रिणीसोबत खेळत असताना आरोपीने तिला पाठीमागून दोन्ही हाताने घट्ट मिठी मारून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. याबाबत कोलाड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल होती. या गुन्हयाचा तपास सहाय्यक पो. नि. एस.ए. जाधव यांनी करुन आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या खटल्याची सुनावणी मा. अति. सह जिल्हा व सत्र न्यायाधीश, माणगाव-रायगड येथे झाली. या गुन्ह्यात पीडित मुलगी व तिच्या मैत्रिणीची साक्ष महत्त्वाचा पुरावा ठरली.

या खटल्यामध्ये अति. शासकीय अभियोक्ता जितेंद्र म्हात्रे यांनी सरकार पक्षाच्या वतीने काम पाहिले. याप्रकरणी पैरवी अधिकारी पो.स.ई. दिनेश आघाव, पो.ह. शशिकांत कासार, शशिकांत गोविलकर, छाया कोपनर, सोमनाथ ढाकणे यांनी सहकार्य केले. मा. विशेष व सत्र न्यायाधीश यू.टी. पोळ यांनी गुन्हा सिद्ध झाल्यानंतर आरोपींना दोषी ठरवून दि. ९ जुलै रोजी पॉक्सो अंतर्गत ती वर्ष सक्तमजुरी व रू. ५००/- दंड व दंड न भरल्यास तीन महिने साधा कारावास व पॉक्सो अंतर्गत ५ वर्ष सक्तमजुरी व रू. ५००/- दंड व दंड न भरल्यास ६ महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.



# मुरुड-शेगवाडा येथील नाला स्वच्छ

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुसळधार पावसाने मागील दोन दिवसांपासून रायगड जिल्ह्याला चांगलेच झोडपून काढले आहे. मुरुड शहरात ४७० मि.मी. पाऊस पडल्याने अनेक ठिकाणी सखल भागात तसेच रस्त्यावर पाणी साचल्याने दिसत होते. यामुळे रस्त्यावरील कचरा गटारात, नाल्यात अडकल्याने पाण्याच्या प्रवाहास अडथहा निर्माण झाला होता. त्यामुळे शेगवाडा येथील काही घराच्या मागील बाजूस पाणी शिरल्याने नागरिक भयभीत झाले होते. येथील काही

## तरुणांच्या पुढाकारातून सफाई

तरूणांनी पुढे येऊन खोल नाल्यात उतरुन नारळाचे झाप, कचरा साफ करुन प्रवाह सुरळीत केला. या तरुणांनी नाला स्वच्छता करुन समाजापुढे एक आदर्श ठेवला आहे.

या स्वच्छता मोहिमेत संचित ठाकूर, मनोज भायदे, संदीप भगत, निलेश भायदे, सतीश भायदे आदींसह तरुण मित्रमंडळाने हातभार लावला. त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# नरेंद्राचार्य महाराजांचा दर्शन सोहळा

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**



जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या अंधश्रध्दा निर्मूलन उपक्रमांतर्गत, अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य स्वामी नरेंद्राचार्य महाराज, जगद्गुरु रामानंदाचार्य दक्षिण पीठ नाणीजधाम (महाराष्ट्र) यांचा मार्गदर्शन व दर्शन सोहळा आणि उपासक व साधक दीक्षा कार्यक्रम फाईन आर्ट्स कल्चरल सेंटर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, पोस्टल कॉलोनी, चेंबूर, मुंबई येथे संपन्न झाला.

अध्यात्मिक कार्यक्रमासह जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानचा मरणोत्तर देहदान उपक्रम जनमानसामध्ये प्रभावीपणे राबविला जात असून, आतापर्यंत ५७ मरणोत्तर देह समाजाच्या सेवेसाठी शासकीय मेडिकल कॉलेजना सुपूर्द करण्यात आले, तर ब्लड इन नीड या उपक्रमाच्या माध्यमातून २१,५६० रुग्णांना रक्त देऊन त्यांचे प्राण वाचविले. संस्थानच्या माध्यमातून ५२ रुग्णवाहिका २४ तास कार्यरत असून, आतापर्यंत २१५४८ हून अधिक जखमींचे प्राण वाचविण्यात यश आले आहे. श्रीक्षेत्र मोफत अन्नदान सेवा, मोफत इंग्रजी माध्यमाची शाळा उपक्रम, कृषीसाठी अत्यावश्यक उपक्रम तसेच आर्थिक मदत असे अनेक उपक्रम संस्थानमार्फत राबविले जातात.

# पाच्छापूर शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**



पाच्छापूर पंचक्रोशीतील शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप रविवारी, (दि. ७) करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते राकेश रामू महाडिक, राजेंद्र महाडिक, शरद महाडिक यांच्या सौजन्याने, बौद्ध विकास मंडळ पाच्छापूर यांच्यामार्फत दिवंगत रामू बाबू महाडिक, मंगला उत्तम शेलार (आदर्श शिक्षिका जि.प. शाळा महाड), उमेश महाडिक, शकुंतला महाडिक यांचे स्मरणार्थ पाच्छापूर पंचक्रोशीतील पाच शाळेतील एकूण ४२१ विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप, इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा प्रत्येकी १०००/- रु. शिष्यवृत्ती देऊन गुणगौरव सत्कार, तसेच पर्यावरण जपण्याकरिता वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र महाडिक, सचिव राकेश महाडिक, उपाध्यक्ष मधुकर महाडिक, सचिव सुरेंद्र महाडिक, पत्रकार सिद्धांत गायकवाड, संदीप डिंगळे, रोहित महाडिक, विनीत महाडिक, स्वदेश फाऊंडेशनचे श्रीधर कोकरे, सुनील खांबे, सुजाता महाडिक, पाच्छापूर पंचक्रोशितील ग्रामस्थ व महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती, तसेच पाचही शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक, माध्यमिक शाळा पाच्छापूर शाळेचे मुख्याध्यापक दिपक माळी, सुचिर खाडे, नारायण वारा, दिव्या जंगम, दर्यागाव जि.प. शाळेचे मुख्याध्यापक धर्मा तांडेल, राजू बंगारे, आसानवाडी जि.प. शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता बंगारे, चौबे, गौळमालधनगरवाडा जि.प. शाळेचे मुख्यध्यापक नरेंद्र कोकाटे उपस्थित होते.

# मानगड श्रमदान मोहीम फत्ते

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

दुर्गवीर प्रतिष्ठान आणि आम्ही सह्याद्रीचे शिलेदार यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव तालुक्यातील किल्ले मानगड येथे नुकतीच श्रमदान मोहीम पार पडली.

नुकत्याच पार पडलेल्या या मोहिमेदरम्यान गडावरील पाण्याचे टाके स्वच्छ करण्यात आले. तसेच वास्तू, अवशेष यांच्या बाजूची झाडीझुडपे साफ करण्यात आली. यामुळे पावसात किल्ल्यावर येणारे दुर्गप्रेमी येथील अवशेष पूर्ण पाहू शकतील. या श्रमदान मोहिमेमध्ये निलेश वाघमारे, नेहा चव्हाण, अजय कदम, सुयोग पाटील, विठ्ठल केंबळे, स्वप्नील खाडे आदींसह मुंबई, पुणे, महाड व माणगावमधील दुर्गप्रेमींचा सहभाग होता.




### पनवेल महानगरपालिका, पनवेल
### जाहीर नोटीस सूचना
### उद्यान व वनसंवर्धन विभाग

झाडांना खिळे ठोकणे, झाडांवर पोस्टर्स/भिंतीपत्रके व जाहिराती लावणे, झाडांवर विद्युत रोषणाई करणे व विद्रुपीकरणास प्रतिबंध करणेबाबत जाहीर आवाहन करणे बाबत.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. काही व्यावसायिक हे त्यांच्या व्यवसायांची जाहिरात व्हावी या हेतुने मुख्यत्व रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांना खिळे ठोकून जाहिराती लावतात. तसचे पोस्टर, भिंतीपत्रके इ. द्वारे जाहिराती चिटकवतात. तसेच त्यांच्या व्यवसायाच्या समोरील झाडांवर विद्युत रोषणाई करतात. यामुळे झाडांना इजा पोहचत असून झाडांवरील सजीवांवर त्याचा दुष्परिणाम होत आहे. तसेच शहराचे सौंदर्यास बाधा पोहोचून शहराचे विद्रुपीकरण होत आहे व पर्यावरणास हानी पोहचत आहे.

याद्वारे सर्व संबंधितांना जाहीर आवाहन करण्यात येते की, त्यांनी झाडांवर पोस्टर्स/भिंतीपत्रके व जाहिराती इ. साहित्य झाडांवर खिळे ठोकून जाहिराती लावली असल्यास तसेच झाडांवर विद्युत रोषणाई केली असल्यास हे जाहिर आवाहन प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत काढून घ्यावे. या कालावधीनंतर जाहिराती आढळून आल्यास संबंधितांवर तसेच झाडांवर विद्युत रोषणाई करणाऱ्यांवर/संबंधितांवर महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम १९९५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच राष्ट्रीय हरित लवादाचे आदेश व मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धी देणेकामी पुढील आदेशार्थ सादर.

सही/-
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

पमपा/उद्यान/२१२४/प्र.क्र २९/५००/२०२४
दिनांक :- ०५/०७/२०२४



### महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां.विभाग, पनवेल**
**पिनकोड-४१० २०६**
**E-mail-panvel.ee@mahapwd.gov.in**
**दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स- ०२२-२७४६७४४०**
**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र.०२ (ई निविदा) सन २०२४-२५**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल ई (दुरध्वनी क्र.०२२-२७४५२७७८ फॅक्स ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण ४ काम समाविष्ठ असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १०.०७.२०२४ सकाळी १०.०० ते दिनांक १८.०७.२०२४ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा.क्र./सा.बां./पनवेल
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग पनवेल, जि.रायगड
दिनांक :-

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे धोकवडे, ता.अलिबाग येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| धोकवडे | ६२६ | ०-०६-२०<br>०-१९-९०<br>०-२६-१०<br>पो.ख. ०-००-८०<br>०-००-५०<br>०-२७-४० | रु. २.०६ | १. गिरी शरद कुलकर्णी<br>२. अभिजित जयवंत देवधर<br>३. आनंद विश्वनाथ देवधर<br>४. सरिता निरंजन जोशी<br>५. सुनिता जयवंत देवधर<br>६. स्मिता विनायक निजसुरे<br>७. स्वाती चंद्रशेखर शिदोरे<br>८. अनघा प्रशांत कऱ्हाडे<br>९. दुर्गेश विवेक गाडगीळ<br>१०. वसंत नारायण देवधर |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
ता. ०९/०७/२०२४

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९४२२३७५११५



### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**
**ई-लिलाव अधिसूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. यांचे द्वारे खालील वेळापत्रकानुसार ई-निविदा प्रणाली माध्यमाने आयआरईपीएस वर प्रकाशित, व्यावसायिक कराराचा ई-लिलाव जाहीर करण्यात येत आहे.

1) **कराराचे नाव:** एसएलआरची लीजींग. **करार लॉट्स ची सं.:** 08. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 22.07.2024** रोजी **11.00 वा.**

2) **कराराचे नाव:** रोड ओव्हर ब्रिज/रोड अंडर ब्रिज जवळ होर्डिंग्स माध्यमाने जाहिरात (महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक). **करार लॉट्स ची सं.:** 20. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 22.07.2024** रोजी **11.00 वा.**

3) **कराराचे नाव:** चिपळूण, कणकवली, कुडाळ, करमळी, कारवार, बैन्दूर स्टेशन परिसरात वीडियो स्क्रीन्स माध्यमाने व्यावसायिक प्रसिद्धी. **करार लॉट्स ची सं.:** 6 (24 मालमत्ता). **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 23.07.2024** रोजी **11.00 वा.**

4) **कराराचे नाव:** अस्नोटी, अंकोला, मुर्डेश्वर, कुंदापुरा, बैन्दूर वर पे ॲण्ड पार्किंग करार. **करार लॉट्स ची सं.:** 05. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 23.07.2024** रोजी **11.00 वा.**

5) **कराराचे नाव:** कोंकण रेल्वे मध्ये कोलाड ते ठोकूर दरम्यान स्टेशनांवर जाहिरात बोर्ड्स, होर्डिंग्स माध्यमाने रेल्वे स्टेशनांवर जाहिरात. **करार लॉट्स ची सं.:** 23. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 24.07.2024** रोजी **11.00 वा.**

6) **कराराचे नाव:** ट्रेनमध्ये जाहिरातींचे प्रदर्शन मडगाव-मंगळुरु-मडगांव (10107/10108) मेमू ट्रेन. **करार लॉट्स ची सं.:** 1. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 25.07.2024** रोजी **11.00 वा.**

7) **कराराचे नाव:** मडगाव येथे पार्सल स्कॅनर. **करार लॉट्स ची सं.:** 01. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 25.07.2024** रोजी **11.00 वा.**

8) **कराराचे नाव:** चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ, सावंतवाडी येथे डिजिटल डिस्प्ले सिस्टीम. **करार लॉट्स ची सं.:** 05. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 26.07.2024** रोजी **11.00 वा.**

9) **कराराचे नाव:** पीएमबीजेके (प्रधानमंत्री भारतीय जन औषधी केंद्र). **करार लॉट्स ची सं.:** 1. **ई-लिलावाची तारीख आणि वेळ: 26.07.2024** रोजी **11.00 वा.**

**वरील सर्व करारांसाठी प्रकाशनाची तारीख:10.07.2024**. चौकशीसाठी कृपया संपर्क करा: श्री प्रवीण डावरे, मो. नं. 9004470597 श्री शैलेश सावंत, मो. नं. 9004470596 श्री मधुकर शेट्टी, मो. नं. 9004476082. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** भेट द्या.



### जाहीर नोटीस
दि. ०९/०७/२०२४

तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे उसरोली, ता. मुरूड जि.रायगड येथील खालील नमुद असलेली जमिन मिळकत. सदर मिळकतीचे विद्यमान मालक जोती बाळाराम पाटील व बाळाराम महादु पाटील यांनी विक्री व्यवहारास काढलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरोसा आमचे अशिल मंगेश प्रभाकर कसबे यांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीशी विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटिस प्रसिध्द करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. त्या संबंधीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| उसरोली ता. मुरूड | ४०८ | ०-५४-६०<br>पो.ख. ०-०४-२०<br>एकुण ०-५८- ९० | १०.७२ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमधील जिरायत ०-२४-७० हे.आर, पो.ख. ०-०४-२० हे. आर, एकुण क्षेत्र ०-२८-९० हे. आर हि मिळकत या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात इतर कोणाचीही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार वहिवाटीचे येणेजाणेचे मार्ग, वारसहक्क आदी कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास वा त्यांचे वरील मिळकतीच्या सदर विकी व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांच्याकडे कळवावी. येणेप्रमाणे सदर विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील. व त्यानंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

दि. ०९/०७/२०२४

**ॲड. मोहनिश मनोहर ठाकुर**
रा. चिंचघर, पो. बोर्ली, ता.मुरूड, जि.रायगड
मो.नं. ८०८००१९११५



### जाहीर नोटीस

तमाम लोंकास या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मुळगाव तर्फे वासरे ता. कर्जत जिल्हा रायगड येथिल खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील हे कुंदनमल उर्फ केवल नरसिमल ओसवाल या विद्यमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ५६ | ४/अ | ०.४०.०० | ४.०१ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क ,पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहीवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
२२/०५/२०२४
मो. नं ९२८४६७७५१६
९८५०६००६४४

आशीलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु. पो कोंदीवडे ता कर्जत
जि. रायगड ४१०२०१



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे म्हात्रोळी, ता.अलिबाग येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| म्हात्रोळी | ३२६ | ०-५७-९०<br>पो.ख. ०-०६-५०<br>०-६४-४० | रु. १६.१९ | १. नरेंद शंकर बोरकर,<br>२. अनिता अनंत खेडेकर,<br>३. पल्लवी प्रभाकर राऊत,<br>४. सिद्धी गणेश गुळेकर,<br>५. शुभांगी सदानंद सुर्वे,<br>६. गौरव सुभाष शहाबाजकर,<br>७. रुजुता रुपेंद्र मडये, |

पैकी ० हेक्टर ३० आर एवढी मिळकत.

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
ता. ०९/०७/२०२४

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९४२२३७५११५



### जाहीर नोटिस

अर्जदाराचे वकिल
ॲड. सविता पिंगळे

**अलिबाग येथिल मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात**

फौ.चौ.अर्ज क्र.१४४/२०२१
नेता ०३/०८/२०२४

श्री. दिलावर गोरमे — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा — सामनेवाला

सदरहु अर्जदार यांचा जन्म दिनांक १४/०४/१९७५ रोजी मौजे रेवदंडा येथे झाला आहे. अर्जदार यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत दप्तरी करवुन घेण्याचे राहुन गेले आहे. सबब एक वर्षाच्या आत अर्जदार यांची जन्माची नोंद न झाल्याने त्यांचे जन्माची नोंद करणेकरीता योग्य त्या न्यायालयाकडुन आदेश प्राप्त करणे गरजेचे असल्याने अर्जदार यांनी सदरचा अर्ज जन्म मुत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचे आदेश होणेकरीता या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

तरी ज्या कोणी व्यक्त इसमास सदर अर्जाचे कामी हरकत असल्यास सदरची नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा वकिलामार्फत उपस्थीत राहुन आपली हरकत किंवा लेखी म्हणणे द्यावे अन्यथा वरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास कोणासही हरकत नाही असे समजले जाईल व अर्जदार यांचे लाभांत त्यांचे मागणीनुसार मुत्युनोंदीचे आदेश करणेत येतील याची कृपया नोंद घ्यावी.

कोर्टाच्या शिक्यनिशी व माझे सहीने आज दिनांक ०६/०७/२०२४ रोजी दिली.

सही/-
**कनिष्ट लिपिक**
**फौजदारी न्यायालय अलिबाग**
**सहाय्यक अधिक्षक रायगड**



### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक



### ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स**



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**निवडक**

### अदानी समूह मुख्य प्रायोजक

**मुंबई :** पॅरिस २०२४ ऑलिम्पिकसाठी अदानी समूह भारतीय संघाचा मुख्य प्रायोजक बनला आहे. खुद्द अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी ही घोषणा केली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून त्यांनी ही माहिती दिली. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सहभागी होणाऱ्या भारतीय खेळाडूंचे मनोबल वाढवण्यासाठी सोमवारी त्यांनी देशाचे साँग कॅम्पेन सुरू केले. तसेच डॉक्युमेंटरी लाँच केली. ते म्हणाले, आम्ही २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकसाठी सज्ज आहोत.

### जोकोविच उपांत्यपूर्व फेरीत

**नवी दिल्ली :** नोव्हाक जोकोविच विम्बल्डनच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला आहे. सोमवारी खेळल्या गेलेल्या उपउपांत्यपूर्व फेरीत त्याने होल्गर रुनेचा ६-३, ६-४, ६-२ असा पराभव केला. आता बुधवारी उपांत्यपूर्व फेरीत त्याचा सामना ॲलेक्स डी मिनौरशी होईल. या सामन्यात चाहत्यांनी केलेल्या उच्छादामुळे तो नाराज दिसला. पॅरिस मास्टर्सच्या अंतिम फेरीत जोकोविचचा पराभव करून रुनेने त्याचे पहिले मास्टर्स १००० विजेतेपद जिंकले होते.

### टेस्टमध्ये दोन गट करा

**मुंबई :** टीम इंडियाचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी कसोटी क्रिकेटचा दर्जा राखण्यासाठी संघांची संख्या ६-७ पर्यंत कमी करण्याची मागणी केली आहे. लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर शुक्रवारी आयोजित वर्ल्ड क्रिकेट कनेक्ट्सच्या उद्घाटन समारंभात शास्त्री बोलत होते. कसोटी क्रिकेटचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी त्यात बदल करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. दर्जा नसेल तर रेटिंग घसरते. प्रमोशन आणि रिलेगेशन सिस्टम तयार करण्याचा त्यांनी सल्ला दिला.

### राहुलला गार्ड ऑफ ऑनर

**मुंबई :** विजेतेपदानंतर राहुल द्रविड घरी परतला आहे. बंगळुरूला घरी गेल्यानंतर त्याने एका लहान मुलांच्या क्रिकेट अकादमीला भेट दिली. यावेळी तेथील लहान मुलांनी त्याला बॅट उंचावत गार्ड ऑफ ऑनर दिला. लहान मुलांनी केलेले हे स्वागत पाहून द्रविडही भारावला होता. त्यानेही त्या मुलांना नाराज न करता त्यांच्याशी हस्तांदोलन केले. भारताने तब्बल १७ वर्षांनी टी-२० वर्ल्ड कपवर नाव कोरले. तसेच हे विजेतेपद भारतीय संघाने राहुल द्रविडच्या मार्गदर्शनाखाली जिंकले.

### मला खेळायचे आहे

**आस्ट्रेलिया :** ऑस्ट्रेलियाचा स्फोटक फलंदाज डेव्हिड वॉर्नरने २०२४ च्या टी-२० वर्ल्ड कपनंतर निवृत्तीची घोषणा केली होती. मात्र, त्यानंतर जेव्हा संघाला त्याची गरज असेल तेव्हा तो उपलब्ध असेल असे त्याने सांगितले होते. परंतु, आता असे दिसत आहे की तो निवृत्तीपासून यू-टर्न घेण्याचा विचार करत आहे. त्याने त्याच्या इंस्टाग्राम पोस्टद्वारे हे सूचित केले आहे. त्याच्या सोशल मीडिया हँडलवरून एक पोस्ट शेअर केली. ज्याद्वारे त्याने निवृत्तीवरून परतण्याचे संकेत दिले आहेत.

# मालदिव सरकारला चूक कळली

## टीम इंडिया खुले निमंत्रण



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघाने टी-२० विश्व चषक जिंकला. हे निमित्त साधून मालदीव पर्यटक संघटना आणि पर्यटक जनसंपर्क महामंडळाने कर्णधार रोहित शर्मा याच्या नेतृत्वाखालील चॅम्पियन भारतीय संघाला खुले आमंत्रण पाठवले आहे. दोन्ही संस्थांनी संयुक्त निवेदन पाठविले आहे. या निवेदनामध्ये त्यांनी भारतीय संघाला मालदीवमध्ये येण्याचे आमंत्रण दिले आहे.

'मालदीव मार्केटिंग अँड पब्लिक रिलेशन्स कॉर्पोरेशनने मालदीव असोसिएशन ऑफ टुरिझम इंडस्ट्रीच्या सहकार्याने टीम इंडियाला विशेष आणि खुले आमंत्रण पाठवले आहे. संस्थेचे एमडी इब्राहिम शिउरी आणि सरचिटणीस अहमद नजीर यांनी आम्ही टीम इंडियाच्या यजमानपदासाठी उत्सुक आहोत. हे निमंत्रण मालदीव आणि भारत यांच्यातील मजबूत दीर्घकालीन सांस्कृतिक आणि क्रीडा संबंधांचे प्रतिबिंब आहे. भारतीय क्रिकेट संघाचे स्वागत करणे. त्यांच्या विजयाच्या आनंदात सहभागी होणे हा मालदीवसाठी मोठा सन्मान असेल. या विजय सोहळ्याच्या आठवणी जपण्यासाठी त्यांना योग्य वातावरण प्रदान करण्यासाठी आम्ही त्यांचा पाहुणचार करण्यास उत्सुक आहोत, असे इब्राहिम शिउरी यांनी म्हटले आहे.

मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईज्जू यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली होती. पंतप्रधान मोदी यांच्यावरील टिकेनंतर भारतीय पर्यटकांनी मालदीवकडे पाठ फिरवली होती. मालदीवने केलेल्या कल्पनेपेक्षा अधिक किंमत एका चुकीमुळे मालदीवला मोजावी लागली. नुकत्याच समोर आलेल्या अहवालानुसार भारतीय पर्यटकांनी मालदीवला श्रीमंत केले. मात्र, तेच पर्यटक आता मालदीवला जाण्यास नकार देत आहेत. मालदीवला जाणाऱ्या भारतीय पर्यटकांच्या संख्येत सुमारे ४० टक्क्यांनी घट झाली आहे. त्यामुळे मालदीवला आर्थिक संघर्षाचा सामना करावा लागत आहे. मात्र, मालदीवने आता ही चूक सुधारण्याचे ठरविले आहे.

भारतीय खेळाडूंचे मुंबईमध्ये ज्या अभूतपूर्व उत्साहात स्वागत झाले. त्यांच्या स्वागतासाठी जो जनसागर लोटला होता. त्याने संपूर्ण जगाचे लक्ष वेधले होते. त्यामुळेच भारतीय पर्यटकांची संख्या घटलेल्या मालदीवने विचारपूर्वक हे पाऊल पुढे टाकले आहे. भारतीय संघ मालदीवमध्ये आल्यास येथील पर्यटकांच्या संख्येत वाढ होऊ शकते. अधिक भारतीय पर्यटकांना आपल्याकडे खेचण्याची ही मालदीवची खेळी आहे.

भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा याला पाठविण्यात आलेल्या निवेदनामध्ये तुम्हला अधिक सुंदर मेजवानी देताना आम्हाला अभिमान वाटेल. तुम्हाला येथे एक संस्मरणीय संध्याकाळ अनुभवता येईल. मालदीवमध्ये तुम्हाला सर्वोत्तम अनुभव मिळेल असे यात म्हटले आहे. दरम्यान, भारतीय संघाचे प्रमुख खेळाडू सध्या ब्रेकवर आहेत. झिम्बाब्वे दौऱ्यानंतर पुढील आंतरराष्ट्रीय सामना २७ जुलैपासून श्रीलंकेविरुद्ध होणार आहे. या मालिकेत ३ एकदिवसीय आणि ३ टी-२० सामने खेळणार आहे.

## रायगड जिल्हा कॅरम असोसिएशन आयोजित

# कै.नथुराम पाटील स्मृतीचषक प्रौढ गटाची निवड चाचणी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जिल्हा कॅरम असोसिएशन व अभिजित कॅरम क्लब अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कै.नथुराम पाटील स्मृतीचषक (कॅरम दिन) जिल्हा अजिंक्यपद प्रौढ गटाची पुरुष व महिलांसाठी निवड चाचणी कॅरम स्पर्धेचे आयोजन केले आहे.

शनिवार दिनांक २७ व रविवार २८ जुलै २०२४ रोजी अलिबाग येथील जेएसएम कॉलेज जिमखाना हॉल येथे हि स्पर्धा होणार आहे. ही स्पर्धा रायगड जिल्ह्यातील पुरुष व महिलांच्या प्रौढ गटासाठी आहे. सदरची स्पर्धा एकेरी स्वरूपात खेळवली जाणार आहे. स्पर्धेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या सर्व खेळाडूंनी आपली प्रवेश नोंदणी फी रूपये २०० नोंदणी शुल्कासह व संस्थेची संलग्नता फी रुपये १०० भरणे गरजेचे आहे.

अधिक माहितीसाठी दिपक साळवी पोयनाड मो.नं ७०२०६०२३३५, सचिन नाईक पनवेल ९२२२१७१२६० /८८५०४६२४११, पांडुरंग पाटील कर्जत ७२७६३४७०१३, प्रदिप वाईगडे कामोठे ९७७३१८३०३०, अमित यादव रसायनी ९९६९६०८२८०/ ९८२२७९१५२०, अभिजित तुळपुळे अलिबाग ९३७२२११८२८ यांच्याकडे नोंदणी करावी. शनिवार२७ जुलै रोजी सकाळी १० वाजता स्पर्धे ला सुरुवात होणार असून रविवार २८ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत स्पर्धेची सांगता होणार आहे.प्रत्येक खेळाडूंनी रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचा लोगो असलेला टीशर्ट परिधान करून स्पर्धा खेळणे बंधनकारक असणार आहे. हि स्पर्धा अखिल भारतीय कॅरम म हासंघाच्या सुधारित नवीन नियम ांप्रमाणे खेळवली जाणार आहे. कोणत्याही खेळाडूंनी स्पर्धा कालावधीत कोणत्याही प्रकारचे धूम्रपान व नशापान करण्यास बंदी आहे. प्रमुख पंच, सहायक पंच व तांत्रिक अधिकारी यांचा निर्णय अंतिम असणार आहे.

स्पर्धेच्या विजेत्यांना रोख रक्कम व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे, तरी रायगड जिल्ह्यातील सर्व खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग होण्याचे आवाहन जिल्हा कॅरम असोसिएशनचे सचिव दिपक साळवी यांनी केले आहे.

# कोहलीच्या वन-८ रेस्टॉरंट विरोधात गुन्हा दाखल

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

विराट कोहलीच्या मालकीच्या रेस्टॉरंट वन ८ विरोधात बंगळुरू पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. सध्या विराट कोहली लंडनमध्ये आहे. टी-२० विश्वचषक विजयाचा मुंबईत कार्यक्रम झाल्यानंतर विराट कोहली लगेच लंडनसाठी रवाना झाला. या प्रकरणाची माहिती देताना डीसीपी सेंट्रल यांनी एएनआय या वृत्तसंस्थेला याबद्दल माहिती दिली, आम्हाला काल रात्री दीड वाजेपर्यंत उशिरा सुरू असणारे सुमारे ३-४ पब आढळले आहेत. मोठ्या



आवाजात गाणी सुरू असल्याच्या तक्रारी आम्हाला मिळाल्या आहेत. पब फक्त पहाटे १ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची परवानगी आहे, असे त्यांनी सांगितले.

एमजी रोडवर असलेला विराट कोहलीच्या मालकीचे वन ८ हे रेस्टॉरंट चिन्नास्वामी क्रिकेट स्टेडियम जवळ आहे. नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विराटच्या या रेस्टॉरंटबरोबर त्या परिसरातील इतरही काही पब आणि रेस्टॉरंटवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक तपास सुरू असून त्यानुसार पुढील कारवाई केली जाईल. ६ जुलै रोजी विराटच्या मालकीचे रेस्टॉरंट हे बंद करण्याच्या नियोजित वेळेच्या २० मिनिटांनंतर म्हणजेच पहाटे १.२० वाजताही खुले असल्याचे आढळले.

दरम्यान, वेळेचे उल्लंघन केल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलीसांनी स्पष्ट केले.

# सेंट मेरीचा विद्यार्थी ऑलिम्पियाडमध्ये चमकला

**। उरण । वार्ताहर ।**

आजकाल शिक्षण क्षेत्रामध्ये सगळ्या स्तरामध्ये स्पर्धेची रस्सीखेच चालू असून, सन २०२३-२४ मध्ये झालेल्या ऑलिम्पियाड परिक्षेत भारतातील २५ राज्यातील ७५० शाळांनी भाग घेतला होता.

त्या परीक्षेत लाखो विद्यार्थी आपले नशीब आजमावत होते. त्यातूनच उरण तालुक्यातील सेंट मेरीज शाळेतील आराध्य मयुरेश पाटील या इयत्ता तिसरीमधील प्रतिभाशाली विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावर रिझनींग विषयात प्रथम स्थान प्राप्त केले आहे. त्या निमित्त त्याला सेंट मेरीज शाळेचे



मॅनेजर फादर मार्शल लोपेझ यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेकडून प्रशस्तीपत्रक, ट्रॉफी व सुवर्णपदक सेंट मेरीज शाळेच्या प्रिन्सिपल सिस्टर मेरी कोनिकरा, सेकंडरीच्या सुपरवायझर संगीता पाटील व प्रायमरीच्या मुख्याध्यापिका रिबेका डिसोझा व शिक्षकांनी सन्मानपूर्वक देऊन सत्कार केले. त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# आंतरराष्ट्रीय खेळाडूंना दिलासा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये उज्वल कामगिरी करून देखील एखादा खेळाडू पात्रतेच्या निकषामुळे प्रोत्साहनपर पारितोषिकापासून वंचित राहू नये, यासाठी राज्य शासनाने नुकतेच पात्रता निकषांमध्ये नवीन सुधारणा केली आहे. यामध्ये सर्व स्पर्धेतील सांघिक स्पर्धा असल्यास आठ देशांचे संघ असणे आवश्यक आहे, तसेच वैयक्तिक क्रीडा प्रकारात आठ देशांचे खेळाडू संबंधित खेळ प्रकाराच्या स्पर्धेत, वयोगटात सहभागी असणे आवश्यक आहे.

# अश्विन बुद्धिबळाच्या पटावर

## अमेरिकन गॅम्बिट्स संघाचा सहमालक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

क्रिकेटबरोबरच रवीचंद्रन अश्विन आता बुद्धिबळाच्या पटावरही आला आहे. अश्विन ग्लोबल चेस लीगमधील अमेरिकन गॅम्बिट्स संघाचा सह मालक बनल्याची माहिती समोर आली आहे. ग्लोबल चेस लीगचा पहिला हंगाम २०२३ मध्ये खेळवण्यात आला होता. आता या लीगचे दुसरे वर्ष २०२४ मध्ये खेळवले जाणार आहे.



अश्विनची गणना जगातील स्टार फिरकीपटूंमध्ये केली जाते. अश्विनच्या फिरकीच्या बळावर भारतीय संघासाठी अनेक सामने जिंकले आहेत. अश्विनचा कॅरम बॉल खेळणं हे महान फलंदाजासाठीही अवघड असतं. पण दरम्यान या लीगमधील एक संघ रवीचंद्रन अश्विनने विकत घेतला आहे. ग्लोबल चेस लीगच्या दुसऱ्या सत्रात सहभागी होणारा सर्वात नवीन संघ अमेरिकन गॅम्बिट्स असणार आहे. ग्लोबल चेस लीग ही स्पर्धा टेक महिंद्रा आणि आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघ यांच्या संयुक्त मालकीची लीग आहे. लीगचा दुसरा हंगाम ३ ते १२ ऑक्टोबर दरम्यान लंडनमध्ये खेळवला जाणार आहे.

# भारतासमोर पुन्हा सनथ जयसूर्याचे आव्हान

## २७ जुलैला होणार पहिला टी-२० सामना

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सनथ जयसूर्याने एकेकाळी क्रिकेट विश्वातील सर्वच गोलंदाजांची झोप उडवली होती. पण सध्याच्या घडीला श्रीलंकेचा संघ हा रसातळाला गेल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आता जयसूर्या पुन्हा श्रीलंकेच्या संघाबरोबर असणार आहे. भारताचा संघ श्रीलंकेच्या दौऱ्यावर जाणार असून त्यांच्यापुढे जयसूर्याचे आव्हान असणार आहे. भारताचा श्रीलंकेचा दौरा हा २७ जुलैपासून सुरु होणार आहे.

झिम्बाब्वेचा दौरा संपवल्यावर भारत श्रीलंकेत खेळायला जाणार आहे. या दौऱ्यात तीन टी-२० आणि तीन वनडे सामने खेळवले जाणार आहेत. त्यानंतर दुसरा टी २० सामना रविवारी २८ जुलैला होणार आहे. या मालिकेतील तिसरा आणि अखेरचा टी २० सामना हा ३१ जुलैला खेळवला जाणार आहे. त्यानंतर भारत आणि श्रीलंका यांच्यातील तीन वनडे सामने हे २, ४ आणि ७ ऑगस्टला होणार आहेत. पण या मालिकेत भारतासाठी सर्वात मोठी डोकेदुखी जयसूर्या ठरणार आहे. जयसूर्याने तुफानी फलंदाजी करत श्रीलंकेल वर्ल्ड कप जिंकवून दिला होता. पण नुकत्याच झालेल्या टी-२० वर्ल्ड कपमध्ये मात्र श्रीलंकेच्या संघाची निराशाजनक कामगिरी झाली होती. श्रीलंकेच्या संघातील मरगळ दूर करण्यासाठी आता जयसूर्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामुळे भारताशी दोन हात करताना श्रीलंकेच्या संघाला अधिक बळ मिळेल. टी-२० वर्ल्ड कपमध्ये ख्रिस सिल्व्हरवूड हे श्रीलंकेचे प्रशिक्षक होते. पण आता त्यांची उचलबांगडी केली आहे. ख्रिस यांच्या जागी आता श्रीलंकेच्या प्रशिक्षकपदी सनथ जयसूर्या यांनी निवड करण्यात आली आहे. जयसूर्याकडे हे हंगामी प्रशिक्षकपद असेल. भारताविरुद्धच्या मालिकेसाठी तरी जयसूर्या श्रीलंकेचे प्रशिक्षकपद सांभाळणार आहे. त्यामुळे भारतापुढे पुन्हा आता जयसूर्याचे आव्हान असेल, पण त्याची भूमिका मात्र बदललेली असेल. सनथ जयसूर्या एकेकाळी भारतासाठी डोकेदुखी ठरला होता. भारताविरुद्ध प्रत्येक सामन्यात तो धडाकेबाज फटकेबाजी करायचा. एक सलामीवीर म्हणून जयसूर्या हा नेहमीच आक्रम क फटकेबाजी करायचा, त्याचबरोबर डावखुरा फिरकीपटू म्हणूनही जयसूर्या संघासाठी योगदान द्यायचा.



## अविनाशचा नवा रेकॉर्ड

# शेतकरी पुत्राची गरूडझेप

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये जागा मिळवणाऱ्या मराठमोळ्या अविनाश साबळेने रविवारी त्याचाच विक्रम मोडत ऐतिहासिक कामगिरी केली. त्याने डायमंड लीगमध्ये स्टीपल चेस प्रकारात केवळ ८ मिनिटे आणि ९.९१ सेकंदात अंतर गाठत ३००० मीटरच्या शर्यतीत सहावे स्थान पटकावले. यासह त्याने राष्ट्रीय विक्रम करताना त्याचा जुना विक्रम मोडला. खरे तर अविनाशने २०२२ मध्ये राष्ट्रीय विक्रम केला होता. तेव्हा तो ८.११.२० सेंकदात ३ हजार मीटर धावला होता. यावेळी त्याने १.५ सेकंदांचा कमी वेळ घेत हे अंतर पार केले. इथिओपियाचा अब्राहम सिम आणि केनियाचा आमोस सेरेम यांनी ८.०२.३६ या वेळेत अंतर गाठून अव्वल स्थान गाठले. तर केनियाच्या अब्राहम किबिवोटने ८.०६.७० वेळेसह तिसरे स्थान पटकावले. मूळचा बीड जिल्ह्यातील असलेल्या अविनाश साबळेने दोन वर्षांपूर्वी बर्मिंगहॅम येथे २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत रौप्य पदक जिंकून राष्ट्रीय विक्रम केला होता. त्याने दहाव्यांदा राष्ट्रीय विक्रम करण्याची किमया साधली आहे.



दरम्यान, अविनाश १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर इंडियन आर्मीम ध्ये दाखल झाला. लष्करासाठी अविनाशने सियाचीनच्या बर्फाळ हिम नदीपासून ते राजस्थानच्या वालुकामय भागापर्यंत देशाची सेवा केली.

# केकेआरचा राहुल मेंटॉर

**। कोलकता । वृत्तसंस्था ।**

गौतम गंभीरने आयपीएल २०२४ दरम्यान कोलकाता नाईट रायडर्स संघाचा मेंटॉर म्हणून जबाबदारी सांभाळली होती. त्याच्या मार्गदर्शनाखाली कोलकाताने विजेतेपदही जिंकले होते. मात्र, आता गंभीर भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक बनण्याची दाट शक्यता आहे. अशात द्रविडला कोलकाता संघात मोठी जबाबदारी मिळू शकते. अनेक आयपीएल फ्रँचायझी द्रविडला संघाशी जोडण्यासाठी उत्सुक असल्याचे बोलले जाते. त्यामुळे राहुलकडे ही जबाबदारी आल्यास आर्श्चय वाटायला नको.

## गगन नारंगची पथकप्रमुख म्हणून निवड

# ऑलिम्पिकसाठी सिंधू ध्वजवाहक

**। दिल्ली । वृत्तसंस्था ।**

तारांकित बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूची आगामी पॅरिस ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यासाठी भारताची महिला ध्वजवाहक म्हणून निवड करण्यात आली आहे. त्याच वेळी लंडन ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक मिळवणारा नेमबाज गगन नारंग यंदा भारताचा पथकप्रमुख असेल.

गगन नारंग यापूर्वी भारतीय पथकाचा उपप्रमुख होता. मात्र, मेरी कोमने पथकप्रमुख म्हणून राजीनामा दिल्यानंतर हे स्थान रिक्त आहे. त्यामुळे आता नारंगची पथकप्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे, असे भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांनी सांगितले. भारतीय पथकाचे नेतृत्व एका ऑलिम्पिक पदकविजेत्यानेच करावे अशी माझी इच्छा होती. मेरीच्या माघारीनंतर ऑलिम्पिक संघटनेतील माझे युवा सहकारी नारंग हे पथकप्रमुखाच्या पदासाठी योग्य उमेदवार होते, असे भारतीय ऑलिम्पिक संघटनेने काढलेल्या प्रसिद्धी पत्रकात उषा यांनी म्हटले



आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय खेळाडू चांगलीच कामगिरी करतील असा विश्वासही या वेळी उषा यांनी व्यक्त केला.सहा वेळची जगज्जेती बॉक्सिंगपटू मेरीने वैयक्तिक अडचणीमुळे आपल्यासमोर पद सोडण्याशिवाय दुसरा पर्याय नसल्याचे कारण देत पथकप्रमुखपदाचा राजीनामा दिला होता.उद्घाटन सोहळ्यासाठी पुरुष ध्वजवाहक म्हणून यापूर्वीच टेबल टेनिसपटू अंचता शरथ कमलचे नाव जाहीर करण्यात आले आहे. महिला खेळाडूची निवड शिल्लक होती. याची पूर्तताही करताना भारतीय ऑलिम्पिक संघटनेने महिला ध्वजवाहक म्हणून सिंधूची निवड केली. सिंधूने ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकली आहेत. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीनेच (आयओसी) 'टोक्यो २०२०' ऑलिम्पिकपासून जुनी परंपरा खंडीत करताना उद्घाटन सोहळ्यात पुरुष आणि म हिला खेळाडू असे दोन ध्वजवाहक राहतील असा नियम केला होता. त्यावेळी टोक्यो ऑलिम्पिकमध्ये मेरी कोम आणि हॉकी संघाचा

# पावसाला रोखणारे स्टेडियम

## ऑस्ट्रेलियात होते उभारणी

**। ऑस्ट्रेलिया । वृत्तसंस्था ।**

पावसाच्या व्यत्ययामुळे अनेकदा क्रिकेट सामने रद्द करण्याची वेळ येते. अन्यथा डकवर्थ लुईस नियमाने टार्गेट सेट केले जाते. अनेकदा तर पावसामुळे पुढचा सामनाच होऊ न शकल्याने डकवर्थ लुईस नियामने विजयी घोषित केला जातो. यामुळे क्रीडारसिकांचा अनेकदा भ्रमनिरास झाला आहे. हातात असलेला सामना अशा पद्धतीने गमवण्याची वेळ आल्याने नाराजीही व्यक्त केली आहे. पण या सर्वांवर तोडगा काढण्यासाठी ऑस्ट्रेलिया सरकारने पावलं उचलली आहेत. यामुळे क्रिकेट सामन्यात पावसाचा व्यत्यय आला तरी सामना थांबवण्याची वेळ येणार नाही. मैदानात पावसाचा संबंध नसल्याने ते सुकवण्यासाठीही धडपड करावी लागणार नाही. ऑस्ट्रेलिया सरकारने जगातील पहिलं ऑल वेदर स्टेडियम बांधण्याची योजना आखली आहे. ऑस्ट्रेलिया सरकारने खास क्रिकेटसाठी स्टेडियम बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या मैदानावर सर्वच ऋतुत खेळता येईल. यासाठी खास डिझाईन तयार केलं असून. छताला गोलाकार काच लावण्यात येणार आहे. जेणेकरून पावसातही येथे सामने सुरळीतपणे पार पडतील.

क्रिकेटव्यतिरिक्तइतरखेळांसाठीही हे मैदान वापरलं जाईल. त्यामुळे ही कल्पना यशस्वी ठरली तर इतर देशातही असे स्टेडियम उभारले जातील. स्टेडियमचं काम लवकरच सुरु होईल आणि २०२८ पर्यंत त्याचं उद्घाटन होईल.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)